
(१०० प्रश्न) (१०० उत्तर)

# वेदांमध्ये काय आहे?





– लेखक –

डॉ. कृष्णवल्लभ पालीवाल

– अनुवादक –

प्रभाकर शा. बोरकर

वेदरत्न, सत्यार्थशास्त्री



शके १९०६)

(मूल्य – ५ रु.



निनाद प्रे. आ. *

ओ३म
गुरु विरजानन्द दण्डी
संदर्भ पुस्तकालय
दयानंद महिला महाविद्यालय
कुरुक्षेत्र
वर्गीकरण नम्बर 3371 .......
पु. परिग्रहण क्रम.......................................

– आ. प्र. नि. सभा, मध्यप्रदेश व विदर्भ द्वारा पुरस्कृत –

(१०० प्रश्न) (१०० उत्तरे)

# वेदांमध्ये काय आहे ?

गुरु विरजानन्द दण्डी
पुस्तकालय
पु परिग्रहण क्रमांक 3371
दयानन्द महिला मह
दिनांक.............

– लेखक –

डॉ. कृष्णवल्लभ पालीवाल

– अनुवादक –

" एकलव्य "

**प्रभाकर शा. बोरकर**

बी. ए. (हिंदी) बी. कॉम., वेदरत्न, सत्यार्थशास्त्री

– प्रकाशक –

सौ. अनुराधा प्र. बोरकर

वेदप्रकाश भवन, उमरी, अकोला–विदर्भ

शके १९०६) (मुल्य ५ रु.

प्रकाशक –
सौ. अनुराधा प्र. बोरकर,
वेदप्रकाश भवन, बोरकर वाडी,
उमरी–अकोला (विदर्भ)

प्रकाशन व विमोचन तिथी –
विजया दशमी,
शके १९०६ : इसवी सन ४ आक्टो. १९८४
गुरुवार

*विमोचन – मा. श्री. अरुण दिवेकर,*
महाराष्ट्र राज्य युवा कल्याण व क्रीडा राज्यमंत्री
यांचे शुभ हस्ते.

प्रथमावृत्ती – २००० प्रती,

मुद्रक – साईनाथ प्रिंटिंग प्रेस, जठारपेठ रोड, अकोला.

मुल्य – रु. ५.००

(सर्वाधिकार सुरक्षित)

## अभिप्राय –

वेद हे हिंदुचे धर्मग्रंथ आहेत. हे ग्रंथ संस्कृत मध्ये लीहीले आहेत. संस्कृत ही देवभाषा आहे. त्या भाषेतील ज्ञान ती भाषा अवगत झाल्या शिवाय समजणे कठीण आहे. मातृभाषेतून ज्ञानाचा प्रसार लवकर होतो. संत ज्ञानदेवांनी संस्कृत गीता प्राकृत भाषेत लोक कल्याणार्थ लीहीली. वेदहि मातृभाषेत परिणीत करण्याचे प्रयत्न सर्वदूर होत आहेत. श्री. प्रभाकरराव शामराव बोरकर, बि. कॉम. सत्यार्थशास्त्री, वेदभुषण ह्यांनी डॉ. कृष्णवल्लभ पालीवाल ह्यांच्या वेदावरील " वेदो मे क्या है " ह्या ग्रंथाचे सुवाच्य मराठीत भाषांतर केले आहे. ते मी वाचले. त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे. त्यांची ही सेवा लोक प्रेमाने स्विकारतील ह्याबद्दल मला संशय नाही.

कृ. रा. ठाकरे
कुलगुरु
पंजाबराव कृषि विद्यापिठ
अकोला

## शुभ कामना

'वेदामध्ये काय आहे' हा बोरकरांनी केलेला मूळ हिन्दी ग्रंथाचा अनुवाद हाताळला, अनुवादाचें कार्य हे अत्यंत चिकाटीचे व परिश्रमाचे असते. 'मूळा' ला जराही धक्का न लावता विषय फुलवायचा असतो. त्यातून हा विषय वरवर पाहता गहन वाटणारा, परंतु लेखकाने त्यातही स्वतःला पूर्णतः बुडवून "वेदातील" मौक्तिके वाचकांना आयतीच आणून दिली आहेत.

वेद हे भारतीय संस्कृतीचे मुळाधार आहेत. आजच्या विज्ञान युगात तिकडे दूर्लक्ष झाल्याने आपली होत असलेली वाताहात डोळ्यांनी दिसते आहे. माणसाचेही यंत्र झाले आहे. त्याचा पुन्हा 'माणुस' करण्यासाठी हे अक्षर वाङमय आवश्यक आहे. तीच अनुवाद कर्त्यांची तळमळ या श्रमामागे आहे. ती फलद्रूप होवो ! ही शुभ कामना

डॅडी देशमुख

## -: अभिनंदन :-

आजचा मनुष्य जितका वैज्ञानिक आणि शैक्षणिक विकासाकडे तिव्रगतीने जातो आहे तितकीच त्याची ईश्वर, धर्म व निती बद्दलची आस्था कमी होतेय् असे का ? हा प्रश्न विचार करण्यासारख्या आहे आपल्या धर्म ग्रंथामध्ये, वेदांमध्ये काय आहे ? हे बहुतेकांना माहीत नाही आणि ते जाणुन घेण्याची त्यांना आवश्यकताही वाटत नाही स्वामी दयानंद सरस्वतींनी आपल्या 'सत्यार्थ प्रकाश' या पुस्तकात ईश्वराची वास्तविक सत्ता आणि बौध्दिक अस्तीत्वाचे फार सुंदर शब्दात वर्णन केले आहे. डॉ. कृष्ण वल्लभ पालीवाल यांनी 'वेदो मे क्या है ?' यापुस्तकाचे अनुवादन करुन वेदांमधील वास्तविकतेला लोकांपर्यंत पोहचविण्याचे श्री बोरकरानी जे कष्ट घेतले ते स्तुतीप्रद आहेत. प्रश्न उत्तराच्या माध्यमाने सामान्य लोकांपर्यंत सोप्या आणि आकर्षक रितीने वेदांना पोहचविण्याचा श्री बोरकरांनी जो प्रयत्न केला तो अत्यंत श्रमनिष्ठ आहे. यात वाद नाही वेदासारख्या गहन, गुढ पुस्तकातील विषयाला इतक्या सुंदर, सोप्या भाषेत ज्या स्वरुपात प्रस्तुत केले हय।वरुन असा विश्वास वाटतो की युवा पिढी निश्चितच वेदाच्या अध्यायनासाठी प्रेरित होईल. श्री बोरकरांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल, त्यांचे अभिनंदन.

कुमुदिनी लाल

दिनांक ४-१०-८४

प्राचार्य

श्रीमती राधादेवी गोयनका महिला

महाविद्यालय, अकोला.



# – निवेदन –

" ऋतं च स्वाध्याय प्रवचने च । सत्यंच स्वाध्याय प्रवचने च ।
तपश्च स्वाध्याय प्रवचने च । दमश्च स्वाध्याम प्रवचने च ।। तै.उ. ९।१० ।।

अर्थात– प्रकृति नियमावर अवश्य चला, परंतु स्वाध्याय आणि प्रवचनाला विसरु नका. त्याच्या मार्गावर अवश्य चला, परंतु स्वाध्याय आणि प्रवचनाला विसरु नका, संतान उत्पादन अवश्य करा, परंतु स्वाध्याय आणि प्रवचनाला विसरु नका. धन कमवा, परंतु स्वाध्याय व प्रवचनाला विसरु नका. कोणतेही कर्म करा परंतू स्वाध्याय अवश्य करा.

आणि स्वाध्याया करिता सर्वो-तम पूज्यनीय ग्रंथ वेद आहेत असे विश्वातील सर्व विद्वानांचे एक मत आहे. कारण त्यांना कळून चूकले, की वेद सार्वकालिक, सार्वदेशिक आणि विश्वातील प्राणिमात्रांच्यासाठी समान उपयोगी आहेत, त्यावर कुठल्याही विशिष्ट सांप्रदायाची मक्तेदारी नाही. वेदांमध्ये असा कुठेच उल्लेख नाही की - हे मानवा तू हिन्दु हो, मुसलमान हो, अथवा ख्रिस्त हो. वेदांची एकच शिकवण आहे की - " मनुर्भव " हे मानवा तू मनुष्य हो. अशाच या सार्वदेशीय वेदांवर हिंदु आपली मक्तेदारी दर्शवितो व वेदांना आपला धर्मग्रंथ म्हणून मान्यताही देतो. परंतु चार वेदांची नावे मात्र प्रत्यक्ष भुदेव (ब्राम्हण) एका श्वासात सांगू शकत नाही. मी अमक्या शाखेचा ब्राम्हण आहे असे तो अभिमानाने सांगतो परंतु त्या " अमक्या " शाखेच्या वेदांमध्ये किती अध्याय आहेत हे मात्र तो भुदेव सांगू शकत नाही. ही गोष्ट ह्या भुदेवांची तर मग इतरांची काय कथा ? असो, हे सूर्यप्रकाशाइतके कटुसत्य आहे ते कुणीही नाकारु शकत नाही. ज्या वेदांच्या ऋचांवर पाश्चिमात्य देशांमध्ये अनुसंधान होत आहे, ज्या वैदिक ज्ञानामुळे समस्त विश्वांमध्ये सहस्त्र वर्षे भारताला " जगत्गुरु " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या भारतातील वर्तमानकालीन कलंकित वास्तविकता आहे. तेंव्हा वेदप्रेमी लोकांना अल्पवेळांत वेदांचा चांगल्याप्रकारे परिचय व्हावा म्हणून डॉ. कृष्णवल्लभ पालीवाल ह्यांनी " वेदो मे क्या है ? " ह्या लेखाद्वारे वेदांवर १०० प्रश्नांची विद्वत्तापूर्ण उत्तरे देऊन हिंदू म्हणवून घेणाऱ्या लोकांवर फार मोठे उपकार केले आहेत. निगोत्र असणाऱ्या व्यक्तीला आपल्या पित्याचे नाव माहीत झाल्यावर जेवढा आनंद होतो, तेवढाच आनंद हिंदू म्हणवून घेराऱ्या लोकांना ह्या लघु पुस्तकामध्ये आपल्या धर्मग्रंथ वेदांचा भरपूर परिचय वाचून झाल्या शिवाय राहणार नाही, अशी अनुवादकर्त्याला खात्री आहे.

अनुवादकर्ता हा भाषाविषय किंवा तत्वज्ञान ह्या दोन्ही विषयांचा विद्यार्थी नाही. वेदासारख्या गंभीर विषयावर काहीही लेखन करण्यास आपण किती अपात्र आहोत ह्याची पूर्ण जाणीव अनुवादकर्त्याला आहे. तथापि युग निर्माता प्रकांड विद्वान महर्षि दयानंदाचे कार्य समजून, हे कार्य हाती घेतले, त्यांच्या कृपेने हातावेगळे झाले, ते त्यांच्या चरणी अर्पण.

पुस्तकाच्या लेखना बाबत स्वातंत्र्य सैनिक कै. श्री. गोविंदमुनी, नथमलजी वर्मा ह्यांनी वरचेवर उत्तेजन दिल्यामूळे व अतिशिघ्रतेने दयानंद संस्थान अध्यक्षा शक्तिपूंज पंडिता श्रीमती राकेश रानी ह्यांनी अनुवाद करण्याची अनुमती दिल्याबद्दल आभार मानणे औपचारिक होईल. कु. उषा माहूलकर बी. ए. बी. एड. ह्यांनी लेखनांस बहुमोल मदत केली.

तसेच आदरणीय प्राध्यापक हिवरे यांनी प्रुफ रिडींग करण्यास अनमोल मदत केली आणि साईनाथ प्रेसचे मालक श्री. नारायण अग्रवाल यांनी पुस्तक कमी वेळात छापून यथायोग्य सहकार्य दिले, त्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्य ठरते.

गुरु दक्षिणेच्या रुपामध्ये म. दयानंदानी अंतिम क्षणापर्यंत वेदाचा प्रचार व प्रसार केला ज्या महर्षींनी वेदाच्या प्रचारार्थ आपल्या समस्त जीवनाची पूर्णाहुती दिली अशा गुरुचे उऋण होण्यास वेदाच्या प्रचारा व्यतिरिक्त दुसरी कोणती श्रेष्ठ गुरुदक्षिणा असू शकेल ? आणि ह्या "एकलव्याला" (अनुवादकर्त्याला) तर वेदासारख्या गंभीर विषयाचा अधिकार त्यांनीच मिळवून दिला जर म. दयानंद नसते तर ह्या "एकलव्याला" हा सुदिन उगवला नसता. करिता माझ्या मुलाच्या (चि. वेद प्रकाश) तृतीय वर्धापनदिनानिमित्त मी ऋषिऋणातून मुक्त होण्याचा हा अल्पसा प्रयत्न करीत आहे. ह्यामध्ये ज्या काही चुका झाल्या असतील त्या वाचकांनी उदार अंतःकरणाने क्षमा कराव्यात, आणि ज्याप्रमाणे शबरीची उष्टी बोरे मर्यादापुरुषोत्तम रामाने गोड करुन घेतली, त्या प्रमाणे वाचकांनी माझा हा अनुवाद गोड करुन घ्यावा, ही नम्र विनंती.

| | |
|---|---|
| वेद प्रकाश भवन, | "एकलव्य" |
| बोरकर वाडी, उमरी, अकोला, विदर्भ | प्रभाकर शामराव बोरकर |
| विजया दशमी शके १९०६ | बी. ए. (हिंदी) बी. कॉम, वेदभूषण |
| गरुवार | सत्यार्थशास्त्री |

१) शब्दार्थ –

प्रश्न १. वेद म्हणजे काय ?

उत्तर मंत्र संहितेचे नाव वेद आहे.

प्रश्न २. वेद किती आहेत ?

उत्तर वेद चार आहेत – ऋग्वेद, यजुर्वेद सामवेद, अथर्ववेद

प्रश्न ३. मंत्र म्हणजे काय ?

उत्तर वेदांच्या छंदोबद्ध रचनेस मंत्र म्हणतात, याचा अर्थ आहे "मनन" करण्या योग्य विचार किंवा उपदेश"

प्रश्न ४. वेद शब्दाचा काय अर्थ आहे ?

उत्तर "वेद" हा शब्द संस्कृतच्या धातूपासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ (विद्-वेत्ति-जाणणे) ज्ञान असा होतो.

२) वेदांग आणि शाखा –

प्रश्न ५, उपवेद किती आहेत ?

उत्तर अर्थशास्त्र, धनुशास्त्र (धनुर्वेद) संगीत शास्त्र (गंधर्ववेद) आणि चिकित्साशास्त्र (आयुर्वेद) क्रमशः ऋग्वेद, यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद ह्या चार वेदांचे उपवेद आहेत.

प्रश्न ६. वेदांग म्हणजे काय ?

उत्तर कल्प, व्याकरण, ज्योतिष्य, निरुक्त, शिक्षा आणि छंद हे सहा वेदांग म्हणून ओळखल्या जातात हे सर्व वेदाचे गूढ आणि रहस्यमय अर्थांना स्पष्ट करण्यांस सहाय्यक होतात.

प्रश्न ७. वेदांच्या शाखा म्हणजे काय ?

उत्तर शाखा पठन पाठनाच्या भेदामुळे वेदांचे अध्ययन आणि चयनाचे संपादनजन्य विशेष रुप आहे, ह्यामध्ये प्रत्येक वेदाच्या सर्व मूलमंत्रांना वेगवेगळ्या ऋषींनी, ऋषी देवता, स्वर, छंद इत्यादींच्या दृष्टीने रुपाने विभाजित व संपादीत केले आहे, हे न वेदांचे विभाग आहेत; न की व्याख्या आदी.

प्रश्न ८ वेदांच्या एकूण किती शाखा आहेत ?

उत्तर वैदिक साहित्यानुसार प्राचीन काळामध्ये ऋग्वेदाच्या एकवीस, यजुर्वेदाच्या एकशेएक, सामवेदाच्या एक हजार आणि अथर्ववेदाच्या नऊ शाखा अस्तित्वात होत्या परंतु ह्या एकंदर १,१३१ शाखापैकी सद्यस्थितीमध्ये खुपच कमी (८–१०) उपलब्ध आहेत.

प्र. ९. ब्राम्हण ग्रंथ, दर्शन शास्त्र, उपनिषद गीता, पुराण इत्यादींचा वेदांशी काय संबंध आहे ?

उ. ह्या ग्रंथामध्ये वेदाच्या विभिन्न विषयांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. वेद तर ईश्वरीय ज्ञान असल्यामुळे स्वत: प्रमाण आहे. परंतु ह्या ग्रंथाचे जे भाग वेदानुकूल आहेत ते परत: प्रमाण आहेत आणि तितकेच मानणे योग्य आहे.

प्र. १०. ब्राम्हण ग्रंथ म्हणजे काय ?

उ. हे वेदांचे सर्वात प्रथम व्याख्यान ग्रंथ आहेत परंत ह्या ग्रंथामध्ये कर्मकांडाची प्रधानता आहे.

प्र. ११. वेदांचे किती ब्राम्हण आहेत ?

उ. प्राचीन काळात तर पुष्कळ ब्राम्हण ग्रंथ होते परंतु सद्यस्थितीत ऋग्वेदाचे तीन ऐतरेय, शाकायान आणि कौषीतकी; यजुर्वेद शतपथ, सामदेवचा महातांड्य आणि अथर्ववेदाचा गोपथ ब्राम्हण इतकेच उपलब्ध आहेत.

प्र. १२. शास्त्र म्हणजे काय ?

उ. वेदांच्या दार्शनिक विचारांना विस्तृत करण्यासाठीच ऋषींनी सहा शास्त्रांच्या रुपामध्ये विभिन्न प्रकारे व्यक्त केले आहे ह्यांना दर्शन शास्त्र असे म्हणतात. ते पुढील प्रमाणे –

१) कपिल ऋषिचे सांख्य दर्शन २) पातांजलि ऋषीचे योगदर्शन ३) गौतम ऋषीचे न्याय दर्शन ४) कणाद ऋषीचे वैशेषिक दर्शन, ५) जैमिनी ऋषीचे पूर्व मीमांसा आणि ६) बादरायण ऋषीचे उत्तर मीमांसा दर्शन अथवा वेदांत दर्शन वेदांमधील विषया बाबत ह्या सहाही दर्शन शास्त्रामध्ये मतैक्य आहे.

प्र. १३. उपनिषद म्हणजे काय ?

उ. हे ब्रम्हज्ञानाचे ग्रंथ आहेत. ह्यामध्ये मुख्यत: ईश्वर आणि जीवत्माचे स्वरुप व आध्यात्मिक विषयांची, कथा किंवा संभाषणाच्या रुपामध्ये खूपच सरलरीत्या वर्णन केले आहे. तसे पाहिले असता वैदिक साहित्यामध्ये एक हजार उपनिषदांचा उल्लेख मिळतो. परंतु ईश, केन, कठ प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य ऐतरेय, तैत्तिरिय, श्वेताश्वतर, बृहदारण्यक आणि छांदोग्य अशी एकंदर अकरा उपनिषदेच सर्वमान्य आहेत. त्यापैकी ईशोपनिषद सर्वात जास्त प्रेरणादायक, ज्ञानवर्धक आणि मानवासाठी अत्यंत उपयोगी आहे. आणि प्रत्येक हिंदू ने हे उपनिषद अवश्य वाचले पाहिजे.

प्र. १४. पुराण म्हणजे काय ?

उ. पुराण हे भारतीय संस्कृतीचे इतिहास ग्रंथ आहेत. ह्यामध्ये काही वैदिक सिद्धांताव्यतिरिक्त सृष्टिविज्ञान, प्रलय राजांची वंशावली आणि विभिन्न संप्रदायाचे इष्ट देवता शिव, शक्ति ब्रम्हा, शिव विष्णु आणि त्यांचे अवतार इत्यादीचे विस्तृत वर्णन आहे. मुसलमान व ब्रिटीश शासन कालामध्ये ह्या पुराणात अनेक वर्ष पर्यंत भेसळ झाल्यामुळे पुष्कळ गोष्टी वेद व बुद्धीच्या प्रतिकुल आहेत.

तसे तर वैदिक साहित्यामध्ये अठरा पुराण आणि अठराच उपपुराणांचे वर्णन उपलब्ध आहे परंतु त्यांच्याविषयी मोठ्या प्रमाणात भ्रांती आहे. सर्व पुराणांच्या सुची मध्ये – १) ब्रम्ह २) ब्रम्हाण्ड ३) विष्णु ४) वराह ५) वामन ६) भागवत, ७) भविष्य ८) मत्स्य ९) मार्कण्डेय १०) अग्नि ११) कूर्म १२) लिंब १३) गरुड १४) पद्म आणि १५) स्कंद ह्या पंधरा पुराणांच्या बाबतीत तर सहमती आहे, परंतु इतर तीन पुराणाविषयी मतभेद आहेत.

क्र. भागवत, देवीभागवत आणि मत्स्य पुराणामध्ये बाकी तीन पुराणांची नावे आहेत – नारद, ब्रम्हवैवर्त आणि पदम पुराणामध्ये यांचे नांवे नारद, शिव आणि ब्रंम्हवैवर्त आहे व भविष्य पुराणांमध्ये शेष पुराणांची नावे वायु, शिव व नृसिंह पुराण असे दिलेले आहेत.

ह्याचप्रकारे उप पुराणांचे नावे आहेत – १) आदि पुराण २) नृहसिंह ३) वायु ४) शिवधर्म ५) दुर्वासा ६) नारद ७) नन्दिकेश्वर ८) शुक्र ९) वरुण १०) साम्ब ११) कल्कि १२) महेश्वर. १३) पद्म १४) देव १५) पाराशर १६) मरीचि आणि १७) भास्कर.

काही विद्वान ह्या पुराणाव्यतिरिक्त आत्मपुराण देवीभागवत महाभागवत, युग पुराण, सौर पुराण आणि केदार कल्पपुराणांची सुद्धा उपपुराणांमध्ये गणना करतात. ह्यावरुन स्पष्ट होते की काही विद्वान नारद, वायु व नृसिंह पुराणांना मुख्य पुराण तर काही विद्वान ह्या पुराणांना उपपुराण मानतात. पुराणांमध्ये अवतारवाद, बहुदेवतावाद, मुर्तिपूजा व देवतांचे पारस्परिक द्वन्द व अश्लील व्यवहारांचे वर्णन वेद विरुद्ध असल्या कारणाने पुराणांचा अधिकांश भाग अमान्य आहे.

३) वेदांचा मुख्य विषय :–

प्र. १५. वेदांमध्ये कोण कोणत्या विषयांचे वर्णन आहे ?

उ. वेदामध्ये मानव जीवनासाठी उपयोगी असलेले सर्व सिद्धात, आदर्श व व्यावहारिक शिक्षांचे वर्णन आहे. ह्यामध्ये ज्ञान विज्ञान सर्वच विषयांचे

कमीत कमी बीज रुपांमध्ये का होईना अवश्य वर्णन केलेले आहे. आणि खाली लिहिलेल्या विषयांचे सर्वच ग्रंथ तर आपणांला वेदमूलक समजतात – १) शिक्षा २) कल्प ३) व्याकरण ४) निरुक्त ५) छंद ६) ज्योतिष्य ६) धर्मशास्त्र ८) पदार्थ विज्ञान ९)साहित्य १०)कला ११) शिल्प १२) राजनीती १३) आयुर्वेद १४) धनुर्वेद १५) गंधर्ववेद १६) नाट्य १७) कर्म १८) ज्ञान १९) उपासना.

प्र. १६. ऋग्वेदाचा मुख्य विषय कोणता आहे ?

उ. ऋग्वेदाचा मुख्य विषय "ज्ञान" आहे. ह्यामध्ये ईश्वर–जीव–प्रकृतीचे गुण, आदर्श, सिद्धांत व जगत व्यवहाराचे वर्णन आहे.

प्र. १७. यजुर्वेदामध्ये कोणत्या विषयाचे प्रतिपादन केले आहे ?

उ. यजुर्वेदामध्ये मुख्यत: कर्मकांड व्यवहाराचे विधान आहे, म्हणजे मनुष्याला ज्ञान प्राप्त करुन मनोवांछित फल मिळण्यासाठी ज्ञानाचा कोणत्या प्रकारे व्यवहारामध्ये उपयोग करावा?

प्र. १८. सामवेदामध्ये कोणत्या विषयाचे वर्णन आहे ?

उ. सामवेदामध्ये मुख्यत: ईश्वर–उपासना, स्तुती आणि आध्यात्मिक विषयाचे वर्णन आहे. ह्यामध्ये मनुष्यांना आपली मानसिक आणि आध्यात्मिक शक्तींचा विकास करण्या सबंधी आणि त्या शक्तिंना समाज कल्याणार्थ लावण्याची प्रेरणा आहे.

प्र. १९. अथर्ववेदामध्ये कोणकोणत्या विषयांचे वर्णन आहे ?

उ. अथर्ववेदामध्ये मुख्यत: विज्ञान जसे – भौतिक विज्ञान, ज्योतिष्य, गणित, विद्युत सृष्टि-रचना, आयुर्विज्ञान, विमानशास्त्र, कृषी, अभियांत्रिकी, तांत्रिकी इत्यादीचे सुंदर वर्णन आहे. राजनीती, समाजशास्त्र व अन्य मानवापयोगी विषयांचे सुद्धा सुंदर वर्णन आहे.

प्र. २०. काय अथर्ववेदामध्ये आजच्या वैज्ञानिक पुस्तकासमान सैद्धांतिक व व्यावहारिक टेक्नॉलॉजीचे सुद्धा वणन आहे ?

उ. होय. अथर्ववेदामध्ये तर सर्वच वैज्ञानिक विषयांचे संक्षेपामध्ये वर्णन आहे. परंतु ह्याच्या आधारावर विकसित विभिन्न सिद्धांतांचे आणि तंत्रांचे अन्य ग्रंथामध्ये विस्तृत वर्णन आहे. त्यापैकी काही ग्रंथांना तर आजचे वैज्ञानिक समजण्यात असमर्थ आहेत. आणि पाहून आश्चर्यचकित होतात. वस्तुत: वेदाचे वैज्ञानिक स्वरुप समजण्यासाठी आर्ष प्रणालीची वैज्ञानिक शद्बावली व परिभाषांना समजण्याची नितांत आवश्यकता आहे. दुर्भाग्याने इस्लामी राज्य कालामध्ये विशाल प्राचीन वैदिक साहित्य धर्मांधतेने जाळून नष्ट करण्यात आले. तरीसुद्धा वैज्ञानिक उन्नतीची अल्प प्रमाणात काही उदाहरणे आपणास रामायण महाभारत आणि अन्य संस्कृत ग्रंथामध्ये पाहावयास मिळतात.

प्र. २१. वेदांचा स्वत:चा काही विशेष क्रम आहे काय ?

उ. होय, वेदांचा क्रम – ऋग्वेद, यजुर्वेद सामवेद अथर्ववेद असा आहे.

प्र. २२. ह्या क्रमाचीं काय विशेषता आहे ?

उ. वेदांचा उपरोक्त क्रम त्यांचे मुख्य विषय – ज्ञान, कर्म, उपासना, आणि विज्ञानाच्या अनुसार आहे. ह्याची विशेषता ही आहे, की मनुष्याने प्रथम विभिन्न विषयाचे ज्ञान प्राप्त करावे. त्या ज्ञानाला आपल्या पुरुषार्थाने विकसित करुन सुयोग्य बनवावे. त्या ज्ञान व कर्मा पासून उत्पन्न शक्तीचा आध्यात्मिक व नैतिक मूल्यांच्या आधारावर समाज आणि प्राणीमात्रांच्या कल्याणाचा सर्वश्रेष्ठ, बुद्धिसंगत आणि सर्वोचित मार्ग आहे. आणि हाच वेदांच्या क्रमाचा संदेश आहे.

## ४) वेदाची मंत्र संख्या आणि वर्गीकरण –

प्र. २३. चारही वेदांमध्ये किती मंत्र आहेत ?

उ. ऋग्वेदामध्ये १०,५२२, यजुर्वेदामध्ये १९७५, सामवेदामध्ये १८७५, आणि अथर्ववेदामध्ये ४,४२७ मंत्र आहेत म्हणजे चारही वेदामध्ये एकूण १९,७९९ इतके मंत्र आहेत.

प्र. २४. ऋग्वेदामध्ये सर्व मंत्रांचे वर्गीकरण कशा प्रकारे केले आहे ?

उ. ऋग्वेदाच्या सर्व मंत्रांना मंडल, अष्टक अनुवाक, अध्याय, सुक्त व मंत्र संख्यामध्ये विभाजित केले आहे. परंतु साधारणत: मंडळ, सुक्त व मंत्र संख्याचाच प्रयोग होतो आणि एकूण १०,५२२ मंत्रांची दहा मंडलामध्ये पुढील प्रकारे विभागणी केलेली आहे. –
१) १९१–१९७६, २) ४३–४२९, ३) ६२–६१७, ४) ५८-५८९, ५) ८७–७२७, ६) ७२–७६५, ७) १०४–८४१, ८) १०३–१७१६, ९) ११४–११०८, १०) १९१–१७४५.

प्र. २५. यजुर्वेदाच्या मंत्रांचे विभाजन कशा प्रकारचे आहे

उ. यजुर्वेदाचे एकूण १९७५ मंत्र चाळीस अध्यायमध्ये अशाप्रकारे आहेत – १–३१, २–३४, ३–६३, ४–३७, ५–४३, ६–३७, ७–४८, ८–६३, ९–४०, १०–३४, ११–८३, १२–११७, १३–५८, १४-३१, १५-६५, १६–६६, १७–९९, १८–७७, १९–९५, २०–९०, २१–६१, २२-३४ २३–६५, २४–४०, २५–४७, २६–२६, २७–४५, २८–४६, २९–६०, ३०–२२, ३१–२२, ३२–१६, ३३–९७, ३४–५८, ३५–२२, ३६–२४, ३७–२१, ३८–२८, ३९–१३, आणि ४०–१७.

प्र. २६. सामवेदामध्ये मंत्रांचे वर्गीकरण कशा प्रकारचे आहे ?

उ. सामवेद मंत्रांना तीन भागांत - १) पूर्वार्चिक २) महानाम्नी आणि ३) उत्तरार्चिक मध्ये विभागल्या गेले. पुर्वार्चिक चे चार कांड - आग्नेय ऐन्द्र, पावमान आणि आरण्यक, ह्यामध्ये एकूण ६५० मंत्र आहेत. महानान्मी एकवीस अध्यायामध्ये १,२२५ मंत्र विभागल्या गेले आहेत.

प्र. २७. अथर्ववेदाचे मंत्राचे वर्गीकरण कोणकोणत्या प्रकारे केले आहे ?

उ. अथर्ववेदाचे एकूण ४,४२७ मंत्र वीस कांडामध्ये विभागल्या गेले आहेत.

प्र. २८. वेदामध्ये मंडळ, अष्टक, अध्याय, अनुवाक, सुक्त, षट्क, वर्ग, दशाती प्रपाठक, त्रिक इत्यादींचे काय महत्व आहे ?

ही व्यवस्था मंत्रांची संख्या, वर्गीकरण व पठन-पाठनाच्या सोयी साठी केल्या गेली आहे. चार वेदांचे वर्गीकरण वेगवेगळे आहे ज्यामुळे हे कळण्यांस मदत होते की कोणता मंत्र कोणत्या वेदातील आहे आणि त्यापासून विषयांच्या संबंधी सुद्धा संकेत मिळतो.

प्र. २९. वेदांच्या मंत्रासोबत लिहिलेले ऋषी, देवता, छंद, आणि स्वरांचा मंत्रांशी काय संबंध आहे ?

उ. ऋषी, देवता, छंद, आणि स्वर हे चारही, मंत्रांच्या विशेष लक्षणांना प्रकट करतात, जे मंत्राचे सत्यार्थ समजण्यासाठीं सहाय्यक ठरतात.

प्र. ३०. ऋषी कुणाला म्हणतात ?

उ. ऋग्वेदातील १०.१०७.६ मंत्रानुसार -

" तमेव ऋषि तमु ब्राम्हणमाहुः यज्ञन्यं सामगामुक्यशासम् "

अर्थात - जो यज्ञकर्ता, सामगाता, मंत्रानुसार आदेश देणारा शुक्लरुपी चमकणाऱ्या प्रकृतीच्या सत्व, रज, तम, रुपी तिन्ही शरीरांना जाणतो आणि ज्याने आपली तपस्या व योग्यतेने सर्वांच्या आधी सर्व सिद्धी प्राप्त करुन घेतल्या व समस्त वेदांच्या रहस्यांना जाणणारा ज्ञानी, विवेकी, सत्य–असत्याचा निर्णय करणारा रागरहित आनंदित व शांत आहे तीच व्यक्ती ऋषी आहे.

प्र. ३१. मंत्रा सोबत लिहीलेल्या ऋषीच्या नावाचा मंत्राशी काय संबंध आहे ?

उ. मंत्रासोबत लिहिलेल्या ऋषीच्या नामाने केवळ हाच भाव प्रकट होतो की त्या ऋषीने विशेष तपस्या व साधना करुन सर्वाआधी त्या मंत्राचे रहस्य व त्याचे आधिभौतीक, आधिदैविक आणि आध्यात्मिक सत्य भावांना आपल्या अंतरात्म्यामध्ये साक्षात्कार करुन प्राणिमात्राला विस्तारपूर्वक समजाविले· तो ऋषी त्या मंत्र अथवा मंत्र समुहाचा प्रथम अध्येता व विशेषज्ञ आहे. म्हणून विद्वानांनी त्यां ऋषीच्या सन्मानार्थ व स्मृति प्रित्यर्थ त्या ऋषीचे नांव मंत्रासोबत जोडून दिले आहे.

प्र. ३२. काय तो ऋषी त्या मंत्राचा रचियता आहे ?

उ. तो ऋषी त्या मंत्राचा रचयिता कदापि नाही. मंत्र तर ऋषींच्या आधी विद्यमान होते. यास्काचार्यांनी निरुक्तमध्ये स्पष्ट लिहिले की –

" साक्षात्कृतधर्माण ऋषयो बभूवुस्ते वरेभ्यो साक्षात्कृतधर्मभ्य उपदेशेन मंत्रान संप्रादुः

नि. १.२०

अर्थात – ज्या ज्या मंत्रांचे दर्शन ज्या ऋषीने सर्वात आधी केले आणि तो सत्य मंत्रार्थ त्याने दुसऱ्याला शिकविले, त्या इतिहासाच्या सुरक्षिततेसाठी आज पर्यंत त्या मंत्रासोबत ह्या मंत्रार्थाच्या द्रष्टा ऋषीचे नाव स्मरणासाठी लिहिल्या जाते, म्हणजे त्याला मंत्रार्थांचा प्रथम द्रष्टा आणि अर्थ प्रचारक समजावे. यास्काचार्य पुढे लिहितात –

" ऋषयो मंत्र द्रष्टारः / ऋषीदर्शनात् / स्तोमान् ददर्शेत्यौपमन्यवः / तद् यदेनां –

स्तपस्यमानान् ब्रम्ह स्वयम्भ्वभ्यामर्षत् तदृषीणां ऋषीत्वमिती विज्ञायते/

नि. २० ॥

अर्थात – ओपमन्यव आचार्यांचे सुद्धा हेच मत आहे की वेदांमध्ये प्रयुक्त स्तुती इत्यादी विषयक मंत्राच्या वास्तविक अर्थाचा साक्षात्कार करणाऱ्यालाच ऋषीच्या नावाने ओळखल्या जाते. तपस्या व ध्यान करीत असतांना जे ह्यांना स्वयंभू नित्य वेदांचे अर्थाचे ज्ञान झाले म्हणून त्यांचे नामकरण ऋषी असे झाले आणि वेदाच्या मंत्राचा रहस्यासहित अर्थ दर्शन हेच त्यांचे ऋषीत्व आहे.

प्र. ३३. वैदिक साहित्यामध्ये काही ठिकाणी ऋषींना मंत्रकर्ता म्हणण्याचे काय तात्पर्य आहे ? काय ते मंत्राचे रचयिता आहेत ?

उ. पं. युधिष्ठिर मीमांसक यांनी प्राचीन ग्रंथाच्या आधारावर ह्या विषयाचे विस्तृत विवेचन करतांना आपले पुस्तक " वैदिक सिद्धांत मीमांसा (पृष्ठ ३३८) मध्ये स्पष्ट लिहिले की मंत्रकर्त्यांचे तीन अर्थ आहेत - १) मंत्रार्थद्रष्टा २) मंत्रार्थाध्यापक आणि मंत्र विनियोजक ह्या अतिरिक्त ब्रम्हकृत, मंत्रवान आणि मंत्रकाराचा सुद्धा हाच अर्थ आहे. वैदिक साहित्यामध्ये मंत्रकर्ता ह्या शद्बाचा अर्थ कुठेही कोणत्याही विद्वानाने मंत्राचा रचयिता असा केलेला नाही.

तैत्तिरीय आरण्यक च्या व्याख्या मध्ये भट्ट भास्कर लिहितात की –

" अथ नम ऋषिभ्य मंत्रकृद्भ्यो मंत्राणा द्रष्टुभ्यः / दर्शनमेव कर्तृत्व /

मै. सं. भाग २

अर्थात – ऋषींचे मंत्रद्रष्टा होणेच मंत्रकर्तृत्व आहे. वास्तविक पाहता ते मंत्राचे रचयिता नाहीत. केवळ मंत्रद्रष्टा आहेत.

पुनः कात्यायन श्रौत सुत्र असलेले पाचव्या प्रकरणावर कर्क ऋषी लिहितात की - "मंत्रकृत्" शद्बामुळे ऋषी मंत्रद्रष्टा म्हणविल्या जातात, मंत्राचे रचनाकार नाहीत अन्यथा वेदमंत्राची नित्यताच समाप्त होईल.

प्र. ३४. प्राचीन ब्राम्हण ग्रंथ व वेद भाष्यकार ह्या विषयी काय म्हणतात ?

उ. पं. युधिष्ठिर मीमांसक यांनी तैत्तिरीय संहिता, ऐतरेय, शतपथ, तांड्य कौषीतकी ब्राम्हण ग्रंथांना व सर्वानुक्रमणी, बृहदेवता, आर्षानुक्रमणी अनुवाकानूक्रमणी अथर्व ब्रहत्सर्वानुक्रमणी, काण्व संहिताचे एकोणतीस प्रमाण प्रस्तुत करीत असता स्पष्ट निष्कर्ष काढला आहे की वेदमंत्राचे ऋषी केवळ मंत्रद्रष्टा आहेत, रचनाकार कदापी नाहीत.

वेदांचे प्राचीन भाष्यकार तित्तिर, कठ, ऐतरेय, कौषीतकी, याज्ञ–वल्क्य, यास्क आदी ऋषी सुद्धा मंत्राच्या ऋषींना मंत्रद्रष्टांच मानीत होते, आणि ह्याच प्रमाणाच्या आधारे वर्तमान युगाचे वेदांचे प्रकांड विद्वान वेदोद्धारक महर्षी दयानंद सरस्वती ह्यांनी आपल्या अमर ग्रंथ "सत्यार्थ–प्रकाश" च्या सातव्या समुल्लास मध्ये लिहिले आहे की – "ज्या ज्या मंत्रार्थांचे दर्शन ज्या ऋषीला झाले आणि प्रथमच त्याच्या आधी त्या मंत्राचा अर्थ कुणी प्रकाशित केला नाही. आणि दुसऱ्यांना शिकविलेही, म्हणून अद्यापही त्या त्या मंत्रासोबत त्या ऋषीचे नांव स्मरणार्थ लिहिल्या जाते आणि जो कुणी ऋषीला मंत्रकर्ता म्हणतो, त्याला मिथ्यावादी समजावे, ते तर अर्थ प्रकाशक आहेत मंत्रकर्ता नव्हे.

प्र. ३५. ऋषींचे मंत्रद्रष्टा असण्याचे अन्य कोणते प्रमाण आहेत ?

उ. पहिले - साधारणतः एकाच सुक्ताचे विभिन्न मंत्रांचे विभिन्न ऋषी असतात, जेंव्हा की, सर्व मंत्रांचा मूल विषय बहुधा एकच असतो. जर हे ऋषी मंत्राचे लेखक असते, तर एकच विषय व सुक्ताचा एकच लेखक ऋषी असावयास पाहिजे होता. विभिन्न ऋषी नाही.

दुसरे–बहुधा एक सुक्ताच्या सर्व मंत्रांची भाषाशैलीही एकसारखी असती जर विभिन्न ऋषी ह्याचे लेखक असते तर एकाच सुक्ताचे एक विशेष विषयाला घेऊन सर्व लेखक ऋषींचे एकाच प्रकारचे मंत्र लिहिणे संभव झाले नसते.

तिसरे - समस्त वैदिक साहित्यामध्ये हे कुठेच लिहिले नाही की अमुक वेद मंत्र अमुक ऋषीने लिहिला. उलट परंपरगत हेच ऐकावयास व

साहित्यामध्ये पहावयास मिळाले कि ऋषी मंत्राचे काय रहस्य जाणणारे प्रथम द्रष्टा व साक्षातकर्ता आहेत, मंत्राचे रचनाकार नाहीत, महाभारताचे वचन आहे की –

" स्वयंभूरेव भगवान् वेदो गीतस्त्वया पुरा । शिवाया ऋषिपर्यन्ताः स्मर्त्तारो ऽ स्य न कारकाः ।

हे परमेश्वर तुम्ही पहिले वेदाला गायीले, शिवा पासून तर सहस्त्र *ऋषीपर्यन्त वेदाचे स्मरण करणारेच आहेत, कर्ता नाहीत.*

प्र. ३६. अनेक मंत्राच्या सोबत शंभर वानप्रस्थ ऋषी अथवा अनेक ऋषी लिहिण्याचा काय अर्थ आहे ? काय त्या मंत्राचे अनेक लेखक झालेत ?

उ. वेद मंत्रांचे अनेक लेखक कदापी होऊ शकत नाही. ह्याचा हाच अभिप्राय आहे की शंभर वानप्रस्थ ऋषींनी अथवा अनेक विद्वानांनी एकत्र मिळून त्या मंत्राच्या रहस्यमय अर्थांवर विचार–विमर्श व चिंतन–मनन केले आणि मंत्रस्थ सत्यार्थाचा साक्षात्कार केला. जसे की आजकाल एखाद्या गुढ समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभिन्न विषयाचे विशेषज्ञांची समिती गठित केली जाते आणि त्याचा विभिन्न दृष्टिंनी चिंतन–मनन केल्यानंतर जो निर्णय निघतो, तो समितिच्या अनेक सदस्यांचा निर्णय किंवा मत मानले जाते हीच स्थिती अशा मंत्रांची आहे, एक मंत्राचे शंभर अथवा पुष्कळसे लेखक कदापि होऊ शकत नाहीत. होय, विचारक किंवा साधक मात्र होऊ शकतात.

प्र. ३७, काय एकच मंत्र विभिन्न वेदांमध्ये पुनः पुनः आला आहे काय ?

उ. होय, काही मंत्र वेदामध्ये आले आहेत. परंतु त्यांचा मुख्य विषय भिन्न असतो आणि केव्हा केंव्हा ऋषी सुद्धा भिन्न असतात. परंतु एकच मंत्राचे लेखक निरनिराळे असू शकत नाही, मंत्रद्रष्टा व उपदेष्टा तर भिन्न होऊ शकतो आणि हेच सत्य आहे.

प्र. ३८. चारहि वेदांचे मंत्रद्रष्टा ऋषी किती आहेत ?

उ. चारहि वेदांचे जवळपास तीनशे ऋषी मंत्रद्रष्टा आहेत.

प्र. ३९. काय स्त्रिया सुद्धा मंत्रद्रष्टा झालेल्या आहेत ?

उ. होय, अनेक स्त्रिया सुद्धा मंत्रद्रष्टा झालेल्या आहेत.
उदा.गार्गी, मैत्रेयी. लोपमुद्रा आदि.

प्र. ४०. वेदांचे पाश्चात्य विद्वान ऋषीला मंत्राचा लेखक का मानतात ?

उ. ह्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण हे की हे पाश्चात्त विद्वान वेदाच्या परंपरागत स्वरुपाशी अपरिचित आहेत. दुसरे कारण हे की वेदांना मनुष्यकृत साधारण ग्रंथ सिद्ध करु इच्छितात ह्या अतिरीक्त

विश्वातील अन्य धर्म पुस्तकाप्रमाणे वेदांचे लेखकाचे नाव वेदावर अथवा वैदिक साहित्यामध्ये कुठेहि न मिळाल्यामुळे त्यांनी सहज अनुमान लावले की मंत्राच्या सोबत लिहिलेले ऋषीच त्यांचे लेखक आहेत. ही त्यांची वैदिक वाड्:मयाची अनभिज्ञता अथवा वेदांना मनुष्य-कृत सिद्ध करण्याचा प्रचारमात्र आहे.

प्र. ४१. मंत्रासोबत लिहिल्या गेलेल्या देवतांच्या नावाचे काय महत्व आहे ?

उ. देवतांच्या नावाने मुख्य प्रतिपाद्य वि याचे ज्ञान होते व वेदांचा सत्यार्थ समजण्यास सहाय्य होते.

प्र. ४२. सामान्यत: देवता शद्वाचा अर्थ प्रकाशयुक्त, दिव्य, पूजनीय इत्यादी होतो. इथे देवताचा प्रतिपाद्य विषय कसा झाला ?

उ. रुढ अर्थाने देवता या शद्वाचा अर्थ दिव्य आदि हाच होतो. परंतु वेद-मंत्रांच्या संदर्भात मात्र देवता शद्वाचा अर्थ प्रतिपाद्य विषयच अशी प्राचीन वैदिक परंपरा आहे. षड्गुरु शिष्य वेदार्थ दीपिका पृष्ठ ६० सर्वानुक्रमणी मध्ये स्पष्ट लिहिले आहे की –

तेन वाक्येन यत् प्रतिपाद्य वस्तु सा देवता । या तेनोच्यते सा देवता ।।
अर्थात – ज्यामुळे मंत्राच्या प्रतिवाद्य विषयाचे ज्ञान होते त्याला देवता असे म्हणतात. महर्षी दयानंद सरस्वती यांनी सुद्धा देवता शद्वाचा अर्थ मंत्राचा प्रतिपाद्य विषय हाच घेतलेला आहे. ऋग्वेदाच्या भाष्य भूमिका मध्ये ते लिहितात की –

" ज्या ज्या मंत्रांमध्ये ज्या ज्या पदार्थाची प्रधानतेने स्तुति केली आहे ते त्यांचे मंत्रमय देवता जाणावे. अर्थात ज्या ज्या मंत्राचा जो जो अर्थ होतो त्यालाच त्या मंत्राची देवता असे म्हणतात. म्हणून ज्यामुळे मंत्रांना पाहून त्यांचा अभिप्रायार्थाचे ज्ञान व्हावे इत्याहि प्रयोजनासाठी देवता शद्व मंत्रासोबत लिहिला जातो.

प्र. ४३. वेदमंत्राचे सत्यार्थ समजण्यासाठी देवता कशाप्रकारे सहाय्यक होतात ?

उ. वेदाचे शद्व यौगीक किंवा योगरुती आहेत म्हणजे त्यांच्या अर्थ शद्वाच्या रचना प्रकारावर निर्भर असतो. जेंव्हा मंत्राच्या पदांच्या देवतांच्या दृष्टिने त्यांचे आधिदैविक, आधिभौतीक व आध्यात्मिक भावांमध्ये अर्थ केला जातो, देवता या मंत्राच्या सत्यार्थाला स्पष्ट व नियंत्रित करण्यास सहाय्यक होतात. आजकाल वेदमंत्राच्या अर्थामध्ये जी व्यापक विभिन्नता दिसून येते त्याचे मुख्य कारण हेच आहे की भाष्यकार आपली पूर्वनिर्धारीत कल्पनेची उडी मारुन प्रतिपाद्य विषयाची उपेक्षा

करुन सीमेच्या बाहेर भटकतो आणि असंगत अर्थ करुन बसतो. ह्या प्रकारे देवतांची उपेक्षा करुन वाटेल तो अर्थ केल्यास संभव आहे, की दोन–चार मंत्रांची संगती ठीक जमेल; परंतु संपूर्ण वेदच काय काही सुक्तांचे सुद्धा या प्रकारे आकलन होणार नाही. काही भाष्यकार काही मंत्रांचा मनमाने अर्थ लावून बसतात म्हणूनच डॉ. सुधीर कुमार यांनी वेद भाष्यकारांची समिक्षा करतांना ह्या तृटी कडे लक्ष केंद्रित केले आहे आणि स्वामी दयानंद सरस्वतींनी वेद भाष्य शैली मध्ये देवतांची उपयोगिता सांगितली आहे.

प्र. ४४. सर्वसाधारणपणे वेदमंत्रांचे देवता–अग्नी, इंद्र, वायु, सरस्वती इत्यादी आहेत, असे का ?

उ. वेदमंत्राचे भाव खूप व्यापक आहेत ह्याचप्रकारे अग्नि आदी शद्वांचा जेंव्हा त्याचा आधिभौतिक, आधिदैविक, आणि आध्यात्मिक भावांमध्ये अग्नी, उर्जा, ज्ञान, परमात्मा असा अर्थ केल्या जातो, तेंव्हा मंत्राचा अर्थ व्यापक आणि विषयानुसार होतो. ह्या प्रकारची व्यापकता, अनेकार्थता आणि सुबोधता अग्नि आदी शद्वांतच येते. म्हणून ह्यांचा सर्वसाधारण-पणे प्रतिपाद्य विषयासाठी प्रयोग केल्या जातो.

प्र. ४५. छंद म्हणजे काय ? वेदांमध्ये किती प्रकारचे छंद आढळतात ?

उ. गायत्री आदी निबद्ध गद्य पद्य रचना विशेषाला छंद म्हणतात. वेदा–मध्ये मुख्यत: २६ प्रकारचे छंद आहेत तसे महर्षी पतंजलींनी ह्याचे चारपट करुन छंदाचे एकशे चार भेद मानले आहेत. मुख्य सव्वीस छंदाची नावे –

१) गायत्री २) उष्णिक् ३) अनुष्टुप् ४) बृहती ५) पंक्ति ६) त्रिटुप् ७) जगती ८) अतिजगती ९) शक्वरी १०) अति-शक्वरी ११) अष्टी १२) अत्यष्टी १३) धृती १४) अतिधृती १५) कृती १६) प्रकृती १७) आकृती १८) विकृती १९) संस्कृती २०) अभिकृती २१) उत्कृती २२) मा २३) प्रमा २४) अतिमा २५) प्रतिमा २६) समा

ह्यामधील पहिले १४ छंद ऋग्वेदामध्ये आणि बाकीचे अन्य वेदामध्ये मिळतात.

प्र. ४६. वेदांच्या छंदामध्ये कमीत कमी आणि जास्तीत जास्त किती अक्षरे असतात ?

उ. सर्वात लहान छंदामध्ये चार आणि सर्वात मोठ्या "अभिकृती" छंदा–मध्ये एकशेचार अक्षरे असतात.

प्र. ४७. मंत्रासोबत लिहिल्या जाणाऱ्या छंदाच्या नावाचा काय उपयोग आहे ?

उ. छंद कोणत्या प्रकारचा आहे हे त्यामुळे कळते. त्यामध्ये किती शब्द असतील आणि नंतर त्याचा पाठ कोणत्या प्रकारे करावा, हे समजून वेदांच्या मंत्राचे योग्य स्वराघातासह गायन सुलभ होते.

प्र. ४८. छंदांना वेदार्थामध्ये काय महत्व आहे ?

उ. पं. युधिष्ठीर मीमांसक यांनी आपल्या अनुपम ग्रंथ "वैदिक छंदोमीमांसा" (पृ. २३ मध्ये) व्याकरणांच्या १२ प्रमाणांच्या आधारावर हा सार काढला, की छंदोज्ञान वेदार्थामध्ये सूक्ष्म रुपाने उपयोगी आहे. छंदाशिवाय अनेक ठिकाणी मंत्राचा अभिप्राय स्पष्ट होऊ शकत नाही.

प्र. ४९. मंत्राचे अक्षरावर एक, दोन, तीन किंवा आडव्या उभ्या रेषा असतात त्यांचा काय उपयोग आहे ?

उ. हे संकेत शब्दांचे स्वरांना प्रकट करतात. मंत्राचा पाठ आणि उच्चारण ह्याच स्वरांच्या आधारावर कसे करावे हे समजण्या करिताया रेषांचा उपयोग होतो.

प्र. ५०. स्वर किती प्रकारचे आहेत ?

उ. स्वर तीन प्रकारचे आहेत – उदात्त, अनुदात्त, व स्वरीत.

प्र. ५१. वेद मंत्रामध्ये स्वरांचे काय महत्व आहे ?

उ. स्वर मंत्रांच्या अर्थांना स्पष्ट करण्यास साहाय्यक होतात. जसे वाक्यां– मध्ये जे पद उदात्त आहे त्याचा अर्थ प्रधान आणि अनुदात्त चा अर्थ गौण होतो. स्वर वेद मंत्राच्या गायनाला सुद्धा नियंत्रित करतात. पं. युधिष्ठीर मीमांसक यांनी आपल्या वैदिक स्वर मीमांसा ग्रंथामध्ये विस्तारपूर्वक विवेचना करुन निर्णय दिला, की स्वर वेदार्थामध्ये परम उपयोगी आहेत. ह्या प्रकारे वेदार्थामध्ये स्वर शास्त्र आणि छंद शास्त्र दोन्हीच्या पारस्परिक सहयोगाची आवश्यकता आहे. मंत्राचा अर्थ मंत्र-पद-क्रमा– नुसारच करावयास पाहिजे आणि प्रतिपाद अवांतर अर्थ अलग–अलग दाखवावयास पाहिजे आधुनिक संस्कृत काव्य ग्रंथाच्या समान मंत्राचा अन्वयपूर्वक एकही अर्थ करु नये, असे केले तर मंत्रार्थामध्ये मंत्र–पद– क्रम अनुसाराने जी सूक्ष्मता येते ती लुप्त होऊन जाते आणि कुठे कुठे अर्थाचा अनर्थ सुद्धा होऊन जातो. महर्षी दयानंद सरस्वती यांनी प्राचीन आचार्यां प्रमाणे मंत्र–पद–क्रमानुसार पदार्थ नामक विस्तृत भाष्य केले आणि स्वरशास्त्राचा प्रयोग केला परंतु त्यांनी सामान्य लोकांसाठी प्रचलित अन्वयानुसार व्यावहारिक अर्थ सुध्दा केला आहे.

६) वेदांचा अविर्भाव –

प्र. ५२. वेदांची रचन कुणी केली ?

उ. वेदांची रचना स्वयं परमेश्वराने केली आहे.

प्र. ५३. निराकर ईश्वर वेदांची रचना कशी करु शकतो ? मंत्र उच्चारणासाठी मुख, जीभ, तालू, इत्यादी तर असावयास पाहिजे.

उ. परमेश्वर सर्व शक्तिमान, सर्वव्यापक आणि सर्वत्र असल्यामुळे प्रत्येक जीवामध्मे व्याप्त आहे. तो कोणत्याही जीवात्म्यामध्ये आपल्या प्रेरणेने वेद विद्येला प्रकाशीत करु शकतो. मुखादी इंद्रियांची आवश्यकता तर आपल्यापासून निराळ्या व्यक्तींना बोध करण्यास व समजाविण्यासाठी असते. ईश्वराने अंतर्यामी रुपाने आदी ऋषींच्या जीवात्म्यामध्ये ज्ञानाचा प्रकाश प्रेरीत केला.

प्र. ५४. परमेश्वरापासून वेदांचे ज्ञान वर्तमान रुपामध्ये कशाप्रकारे आहे ?

उ. सृष्टीच्या प्रारंभी ईश्वराने वेदांचे ज्ञान सर्वात प्रथम चार ऋषींच्या हृदयामध्ये प्रकाशीत केले. तदनंतर त्यांनी ब्रम्हा आदी ऋषींना त्याच ज्ञानाला सत्य–अर्थ रुपात ऐकविले आणि समजाविले, म्हणून वेदांना श्रृती सुद्धा म्हणतात आणि त्या ऋषींनी परंपरागत गुरु–शिष्य प्रणाली द्वारा विद्वानांना आणि साधारण मनुष्यापर्यंत वेदाचा संदेश पोहचविला. पहा वेदाचे प्रमाण –

"इमां धियं सप्तशीर्ष्णी पिता न ऋतप्रजातां बृयतीमविंदद् ।
तुरीय स्विज्जनयद् विश्वजन्यो यास्य उक्तमिंद्राय षंसन ॥ १०–६७–१

अर्थात– यजमान म्हणतो की आमचे पिता प्रपितांनी सात छंद असणारी परमेश्वरा पासून उत्पन्न ज्या महती बुद्धी आणि क्रियांना प्राप्त केले आहे. मी अचमलती विश्वाच्या हितेषी ईश्वरासाठी ह्याचे स्त्रोत्राचे गान गात अलता चतुर्थ पिढीला सुद्धा ह्याचा उपदेश देत आहे. पुन्हा

"बृहस्पते प्रथम वाची अग्रंयत् प्रेरत नामधेयं दधाना : ।
यदेषां श्रेष्ठ यदरिप्रमासीत् प्रेणा तदेषां निहितं गुहाविः ॥

ऋ. १०–७१

अर्थात– विद्वानजन पवित्र भावनांची वेदवाणी जाणतात आणि ऋषींच्या अंतःकरणामध्ये प्रविष्ट झालेल्या त्या वाणीस प्राप्त करतात. नंतर तिला धारण करुन सर्वप्रसारीत करतात. ह्या वेदवाणी मध्ये गायत्री आदी सात छंद सर्वतः प्रयुक्त आहेत.

प्र. ५५. कोणत्या ऋषीच्या हृदयामध्ये कोणत्या वेदाचा प्रादुर्भाव झाला ?

उ. अग्नि ऋषीपासून ऋग्वेद, वायू पासून यजूर्वेद, आदित्य पासून सामवेद आणि अंगिरा पासून अथर्ववेदाचा अविर्भाव झाला. हेच शतपथ ब्राम्हण चे –

"अग्ने ऋग्वेदो वायोर्यजुर्वेदः सुर्यात्सामवेदः ।। श. १.८.२.३.

आणि

अथर्ववेद १०.७.२० चे " सामानि यस्य लोमान्यथर्वाऽङ्गिरसो मुखम् "
" चे वचन आहे.

प्र. ५६. ईश्वराने वेदांचे ज्ञान ह्याच ऋषींच्या हृदयामध्ये का प्रेरीत केले ? सर्वच मनुष्यांच्या हृदयामध्ये का प्रेरीत केले नाही ?

उ. अग्नि, वायू, आदित्य आणि अंगिरा ह्या चार ऋषींचे पूर्व पुण्य इतके पवित्र, निर्मल आणि उत्तम होते की त्यांच्या हृदयामध्ये वेदांचा प्रकाश प्रेरीत केल्या गेला. ह्या ऋषींनी हे दिव्य गुण प्रवाहाने अनादी आपल्या श्रेष्ठ कर्मांनी प्राप्त केले. स्वामी दयानंद लिहितात की जीव, जीवांचे कर्म आणि स्थूल कार्य जगत् हे तिन्ही अनादी आहेत. जीव आणि कारण जगत स्वरुपाने अनादी आहेत. कर्म आणि स्थूल कार्य जगत प्रवाहाने अनादी आहेत.

प्र. ५७. वेद ईश्वरीय ज्ञान कां आहे ?

उ. वेद मंत्रांच्या विशेषांच्या आधारावर आपण निश्चित रुपाने म्हणू शकतो की वेद ईश्वरीय ज्ञान आहे. कोणतेही ज्ञान ईश्वरीय आसण्या–साठी खालील गोष्टी असणे जरुरी आहे –

१) त्या ज्ञानाचा अविर्भाव सृष्टीच्या आरंभी व्हावयास पाहिजे, जेणे करुन मनुष्याला आपल्या कर्तव्य–अकर्तव्याची जाणिव व्हावी.

२) त्या ज्ञानामध्ये मानव इतिहास असायला नको जसे की आपण महाभारत, रामायण कुराण बायबल इत्यादी मध्ये पाहतो.

३) ते ज्ञान सृष्टीच्या अनुकुल असावयास पाहिजे, म्हणजे ते ज्ञान वैज्ञानिक सिद्धांतानुसार व प्रकृती च्या रहस्यांना स्पष्ट करणारे असावे.

४) ते ज्ञान तर्कसंगत, विवेकपूर्ण व विरोधाभासापासून मुक्त असावयास पाहिजे त्यामध्ये वृद्धी, क्षय, व विपरीतता असावयास नको, जसे की आपणांस साधारणतः मनुष्यकृत पुस्तकामध्ये एकाच विषयावर परस्परविरोधी विचार पहावयास मिळतात.

ते ज्ञान ईश्वराचे स्वरुप, स्वभाव आणि गुणांचे अनुकूल असावयास पाहिजे, जसे की पवित्र सर्वविद्याविद सत्यरुप शुध्द न्यायकारी आदी गुणधारक आहे. ह्याच प्रकारे ते ज्ञान सुद्धा सत्य व संपूर्ण असा–वयास पाहिजे.

६) ते ज्ञान सार्वकालिक, सार्वदेशिक आणि विश्वातील प्राणीमात्रांसाठी एक समान उपयोगी, व्यवहारिक व देश प्रांत, भाषा, बोली, जातीं-च्या सीमापासून मुक्त, स्त्री, पुरुष, आदी च्या भेदभावांपासून रहित, सर्वांसाठी कल्याणकारी आणि प्रेरणादायक असावे आणि त्याचे द्वारा मानव जात आपला सर्वांगीण विकास करु शकली पाहिजे.

वर लिहिलेले सर्व लक्षणे केवळ वेदातच पाहावयास मिळतात. विश्वा–तील कुण्या दुसऱ्या धर्म पुस्तकामध्ये अथवा कुण्या विद्वान–समूह द्वारा रचित ग्रंथामध्ये नाही. परंतु वेदांचे खरे स्वरुप समजण्यास आपणाला वैदिक परंपरानुसार केल्या गेलेल्या वेद भाष्यांनाच वाचले पाहिजे ज्याचा महर्षी दयानंद सरस्वतींनी वर्तमान युगामध्ये पुनरुद्धार केला आहे.

५८. काय वेदापासून सुद्धा प्रकट होते काय की वेद ईश्वरीय ज्ञान आहे ?
होय, चारही वेदांच्या अंतःसाक्षी वरुन हे सिद्ध होते की वेद ईश्वरीय ज्ञान आहे. ऋग्वेदाचे काही प्रमाण ह्या प्रकारे आहेत –

१) 'अहं ब्रम्ह कृण्वम्' १०.४९.१. अर्थात - मीच ब्रम्हज्ञान दिले आहे.

२) "देवत्तं ब्रम्ह गायत" १.३७.४ अर्थात - परमात्माने दिलेल्या वेद ज्ञानाला जाणून घ्या.

३) 'प्रेतु ब्रम्हणस्पतिः प्रदेवेतु सूनृता' ।। १.४०.३
अर्थात – ज्ञानाचा स्वामी तथा त्याची सूनृतावाणी आम्हास प्राप्त होवो.

४) "ऋतस्य श्लोको बधिरा ततर्द कर्णा बुधानः शुचमान आयोः"
४.२३.८
अर्थात – समजाविलेले, परमेश्वराने दिलेले शुद्ध ज्ञानच मनुष्याचे या बहिऱ्या कानांना उघडते.

५) "या ते अग्ने पर्वतस्येव धारा सचंती पीपयद्देव चित्रा तामस्यभ्यं प्रमितं जातवेदो वसो रास्व सुमतिं विश्वजन्याम् ।। ऋग् ३.५७.६
अर्थात – हे अग्निदेव जो तुझी पर्वत धारासमान प्रवाहशील, कुठे न

थांबणारी विचित्र (वेदमयी) ज्ञानधारा निरंतर ज्ञान देते आहे. हे वसो, जातवेद सर्वज्ञ भगवान् आम्हाला ती–उम बोधक सर्वजन-चितकारिणी वेदरुपी सुमती दे.

६) दूममूषु त्वमस्माकं सनिं गायत्रं नव्यांसम् अग्ने । देवेषु प्रवोच ः॥

ऋ. १.२७.४

अर्थात – हे अनंत विद्यामय जगदीश्वर सर्व विद्यांचा उपदेश कर–णाऱ्या आणि सर्व मंगलांना देणाऱ्या तू जसे सृष्टीच्या आदि मध्ये पुण्यात्मा अग्नि, वायू. आदित्य, अंगिरा नामक मनुष्यांच्या आत्म्या-मध्ये नवीन–नवीन बोध करणारा गायत्री आदी छंदाने यक्त ज्या-मध्ये सर्व प्राणी सुखाचे सेवन करतात, त्या चारही वेदाचा उपदेश केला.

पुढील कल्पादी मध्ये पुन्हा करशील, तसे त्या वेदज्ञानाला विविध प्रकाराने आमच्या आत्मांमध्ये चांगल्या प्रकारे दे.

७) "अयं ते स्तोमो अग्रिया हृदि स्पृगस्तु शंतमः । अथा सोमं सुतं पिब ।

ऋ. १.१६.७

अर्थात – हा सर्वांत प्रथम स्तुति समुह – वेदज्ञान हृदयाला स्पर्श करणारा तथा शांतिदायक होवो. वेदज्ञान प्राप्त करुन उत्तम ऐश्व-र्यास भोगा.

८) "तस्मात् यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे । छंदासी जज्ञिरे

तस्माद्यजुस्तस्मादजायत् ॥ ऋ. १०.९०.९

अर्थात – हे मनुष्यांनो ज्या परमेश्वरा पासून ऋग्वेद, यजुर्वेद, साम-वेद अथर्ववेद उत्पन्न झाले आहेत, त्याची उपासना करा. वेदांना वाचा आणि त्यातील आज्ञेनेनुसार आचरण करुन सुखी व्हा.

ह्या मंत्रा व्यतिरिक्त ९.७३.८, ३.२६.९, ८.१०१.१६, १०.३.२६ व अन्य शेकडो मंत्रांचे प्रमाण दिल्या जावू शकते.

प्र. ५९. काय यजुर्वेदामध्ये सुद्धा असे प्रमाण आहेत ?

उ. होय, यजुर्वेदाचे सुद्धा अनेक मंत्रवेदांना अपौरुषेय सिद्ध करतात. उदा–हरणासाठी –

१) "यथेमां वाचं कल्याणीमावदानि जनेभ्यः ब्रम्हराजन्याभ्यां शूद्राय च स्वाय चार्यायचारणाय । यजु. २६.२

अर्थात – परमेश्वर उपदेश करतो की ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, तथा शुद्रासाठी कल्याणकारी वाणी (वेदवाणी) ला प्रस्तुत करतो.

२) पृच्छामि वाचः परमं व्योम । ब्रम्हायं वाचः परमं व्योम ॥

यजु. २३–६१–६२

अर्थात – शिष्य गुरुला म्हणतो की "मी तुझ्या वाणीचा परम आश्रयी आहे."

३) "स्वयंभूर्याथातथ्योऽर्थान व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः । यजु.४०.८

अर्थात – स्वयं परमेश्वराने सनातन उचित ज्ञान सर्वांसाठी दिले.

प्र. ६०. अथर्ववेदामध्ये वेद ईश्वरीय ज्ञान असल्याचे काय प्रमाण आहे ?

उ. १) "अहमेव स्वमिदं ब्रवीमि जुष्टं देवेभिरुत मानुषेभिः ॥ अथर्व

अर्थात – मी साधारण तथा देवतुल्य मनुष्यांचे प्रती ह्या प्रिती–पूर्वक सेवनीय ज्ञानाला देत आहे.

२) "अहं सत्यमनृतं यद् वदामि देवी परिवाचं विशश्च ।

अथर्व. ६.६१.२

अर्थात – मीच सत्य–असत्यामध्ये भेद करुन प्रजेसाठी दैवी वाणीस (वेदवाणी) म्हटले आहे.

३) "यथा भर्गस्वती वाचमावदानी जनां अनु । अथर्व. ६.६९.२

अर्दात – मी ह्या तेजस्वी वाणीस मनुष्यांसाठी म्हणीत आहे.

४) "यस्मादृचो अपातक्षन् यजुर्यस्मादपाकषन् सामानि यस्य लोमान्य-थर्वांङ्गि रसो मुखम् । स्कंभ तं ब्रू हि कतमः स्विदेव सः ॥

अथर्व . १०.७.२०

अर्थात ऋग्वेद ज्याचे प्राणां समान, यजुर्वेद, हृदया समान, सामवेद रोमा समान आणि अथर्ववेद ज्याचे मुखा समान आहे. चारही वेद ज्या पासून उत्पन्न झालेत तो कोणता देव आहे. उत्तर आहे, की जो सर्व जगताला धारण करणारा परमेश्वर त्याचे नाव "स्कंभ" आहे, त्यालाच तुम्ही वेदांचा कर्ता जाणावे.

५) "काव्येन सत्यं जातेनास्त्रिजातवेदाः । अथर्व. ५.११.२

अर्थात – मीच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद रुपी काव्य बनविले आहे. ह्या प्रकारे शेकडो मंत्रांचे उदाहरण दिल्या जाऊ शकते, की ज्यामुळे वेद ईश्वरीय ज्ञान असल्याची पुष्टी मिळते.

प्र ६१. ईश्वराला कवी का म्हटल्या गेले ?

उ. परमेश्वराला वेदज्ञानाचा सर्वात प्रथम उपदेष्टा, वक्ता आणि त्याच्या काव्यमयी वाणीमुळे ईश्वराला कवी म्हटल्या गेले. उदाहरणासासाठी

१) कवीः कवीनाम् (ऋ. २.३१.१)

अर्थात – तो कवीचाही कवी आहे.

२) " अयं कविरकविषु प्रचेता मर्त्येष्वग्निरमृतो निधायि ।

ऋ. ७.४.४

अर्थात – हा कवि अकवींमध्ये ज्ञानदाता आहे, मरणधर्मा चेतन जीवामध्ये अमृत चेतन आहे.

३) अग्ने ! कविः काव्येनाति विश्ववित् । १०.११.३

अर्थात – हे अग्ने तू सर्व काही जाणणारा आहेस, आपल्या काव्या (ज्ञाना) द्वारा तू कवी आहेस.

४) कविररि प्रचेता : ५.२१.१

अर्थात – तो प्रकृष्ट ज्ञानवान कवी आहे.

५) " न त्वदन्यः कवितरः ५.११.४

अर्थात – तुझ्यासारखा अन्य कोणी कवी नाही.

६) " पश्य देवस्य काव्यं न ममार न जीयति । अथर्व. १०.८.३२

अर्थात – परमात्म्या च्या काव्याला पहा, ज्याचे न कधी अध्ययन बंद होते आणि न कधी जुने होते, अर्थात ज्याचे विचार प्रत्येक कालामध्ये व्यवहारीक असतात. हृया अतिरिक्त यजुर्वेद ४०.८ मध्ये ईश्वराला अन्य लक्षणांनी संबोधीत केलेले आहेत जसे ब्रम्ह सर्वशक्तिमान, शरीर रहीत, छिद्ररहीत, नाडी रहीत, पापरहीत, चे व्यतिरिक्त त्याला कवी सुद्धा म्हटले आहे.

हाच विचार ऋग्वेद ५.५२ मंत्रामध्ये प्रतिपादीला आहे म्हणजे वेद ज्ञान दिल्यामुळे ईश्वराचे एक नाव कवी सुद्धा आहे.

६२. ईश्वराला बृहस्पती अथवा ब्रम्हकृत का म्हटले आहे ?

परमेश्वराला हृया नावाने हृयासाठी संबोधिले आहे की ईश्वरच ज्ञानाचा स्वामी आणि प्रथम उपदेशक आहे., पहा –

१) बृहस्पते प्रथम अग्रेयत् प्रैरत नामधेयं दधानाः । यदेषां श्रेष्ठं यदरिप्रमासीत् प्रेणा तदेषां निहितं गुहाविः ।। १०.७१.१

अर्थात – सृष्टीच्या प्रारंभी शद्बांच्या नामरुपाला ग्रहण करुन ऋषींच्या हृदयामध्ये बृहस्पती (प्रभु) ने आमल्या सर्वश्रेष्ठ वेद–वाणीला प्रेरीत केले.

३) " प्र नुनं ब्रम्हणस्पतिः मंत्रं वदत्युक्थ्यम् ऋ. १.४०.१

अर्थात – निश्चयीपणेच ज्ञानाचा स्वामी ब्रम्हणस्पती परमात्मानेच स्तुत्य मंत्रांचे प्रवचन केले आहे.

३) प्रेतु ब्रम्हणस्पतिः पेदेव्येतु सूनृता । ऋ १.४०.३

अर्थात – ज्ञानाचा स्वामी तथा त्याची सूनृता वाणी आम्हाला प्राप्त होवो.

४) "स प्रथमो ब्रम्हस्पतिश्चिकित्वान्। यजु. ७.१५

अर्थात – बृहस्पतिच सर्वांत ज्ञानी आहे, त्याच्यापासूनच ऋषींनी ज्ञान प्राप्त केले आहे.

६) "बृहस्पती: प्रथमं जायमान: मह: ज्योतीष: परमे व्योमन्

अथर्व. २०,८८.४

अर्थात – ज्ञान दातव्य रुपाने बृहस्पती परमेश्वर सर्गादीमध्ये प्रकाशित होते.

प्र. ६३. वेद सृष्टीच्या प्रारंभी प्रकट झाले, ह्याचे काय प्रमाण आहे ?

उ. पहिले प्रमाण – वेदांना न मानणारेसुद्धा हे कबूल करतात, की वेद विश्वातील प्राचीनतम पुस्तक आहे.

दुसरे प्रमाण – उपरोक्त अनेक वेद मंत्राच्या व्यतिरिक्त ऋग्वेद १.१६४.३७ चे वचन आहे की –

"न विजानामि यदि वेदमस्मि निण्य: सन्नद्धो मनसा चरामि ।
यदा मगन् प्रथमजा ऋतस्यद्धि द्वाचो अश्नुवे भागमस्या: ।।

अर्थात – जो काही मी आहे. त्याला विशेष रुपाने ओळखत नाही त्याना मूढ समान मी बांधलेला विचरीत आहे जेंव्हा मी ह्या "सत्य ज्ञाना" च्या पहिले उत्पादकाला प्राप्त होतो, तेंव्हाच ह्या वेदवाणीच्या अधिकारास पात्र होतो.

पुन:

"यो अदधात् ज्योतिषि ज्योतिरंतर्यो असृज न्मधुना सं मधूनि ।
अध प्रियं शूषमिद्राय मन्म ब्रम्हकृतो बृहदुक्थथा दवाधि

ऋ. १०.५४.६

अर्थात – जो ज्योतीमध्ये ज्योती टाकतो, मधुमध्ये माधुर्याला चांगल्या प्रकारे मिसळवितो. ह्या नंतर इंद्रिय अधिष्ठाता जीवा–साठी बलकारक, खूप खूप मोठे मननात्मक ब्रम्हकृत ऋग्वेद ज्ञान परमेश्वराने दिले.

मदनमोहन विद्यासागर यांनी शेकडो वेदमंत्रांचे उदाहरण देऊन "वेदों की अंत:साक्षी का महत्व" ह्या पुस्तकामध्ये हा निष्कर्ष काढला, की वेद हे त्या कवी तथा मनिषी सृष्टीकर्ता परमेश्वराचे एक काव्य आहे. ते छंदोमय आहे. ज्यामध्ये त्रयीविद्याची वाणी आहे. आणि ही त्रिविद्या ऋग, यजु, साम. तथा अथर्व ह्या भागामध्ये

विभक्त आहे. ह्या त्रयीविद्येस यज्ञबृहस्पती, पुरुष, बृहस्पती आदी नावे असणाऱ्या परमेश्वराने सृष्टी निर्माण करते वेळी ह्या विद्येस प्राप्त करण्याची क्षमता असणाऱ्या देवांना विद्वान ऋषींच्या हृदया मध्ये स्थापीत केले आणि त्या ऋषींनी ह्या विद्येस (वेदांना) संपूर्ण विश्वातील प्राण्यांच्या कल्याणार्थ ऐकविले.

प्र. ६४. हिंदूंच्या अन्य धर्मग्रंथांमध्ये वेदांच्या रचनाकारा विषयी काय मत आहे ?

उ. ब्राम्हण ग्रंथ, उपनिषद, स्मृति, पुराण, महाभारत, रामायण इत्यादी सर्व ग्रंथांमध्ये वेदांना ईश्वरीज्ञान म्हटल्या गेले आहे. जसे – शतपथ ब्राम्हणामध्ये महर्षी याज्ञवल्क्य आपल्या विदुषी पत्नी मैत्रेयीला उपदेश करताना म्हणतात की –

"एवं वा अरेऽस्य महतो भूतस्य निःश्वसितमेतद् ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वांगिरस :

अर्थात – जसे मनुष्याच्या शरीरातून श्वास बाहेर निघतो. तसेच सृष्टीच्या आरंभी ऋग, यजु, साम, व अथर्ववेद उत्पन्न झालेत ह्याच प्रकारे महाभारतात म्हटले आहे –

अनादिनिधना नित्या वागुत्सृष्टा स्वयम्भुवा । आदौ वेदमयी दिव्या यतः सर्वाः प्रवृत्तयः ॥ "

अर्थात – सृष्टीच्या आरंभी स्वयं परमात्म्यापासून अशी वाणी, वेद म्हणून निघाली. तिचा न आदी आहे न अंत. जो नित्य नाशरहीत आणि दिव्य आहे, ज्यामुळेच संसारामध्ये सर्व प्रवृत्तींचा प्रकाश झाला. परंपरागत सर्व हिंदू पूर्वजांकडून आपण हे ऐकीत आलो आहे, व मानीत आलो आहे, की सृष्टीच्या आरंभामध्ये वेदांचा अविर्भाव परमेश्वरा द्वारा झाला.

प्र. ६५. भारतीय दर्शनाशास्त्रांचे वेदांच्या रचनाकारां विषयी काय मत आहे ?

उ. सर्वच दर्शन शास्त्र हेच मानतात की वेद ईश्वरीय ज्ञान आहे. ह्या विषयी सर्व सहाही दर्शनामध्ये मतैक्य आहे. उदाहरणासाठी वेदांत दर्शन १–३ मध्ये

१) "शास्त्र योनित्वात्" वेदशास्त्राचे कारण ईश्वर आहे. आचार्य शंकर सुद्धा आपल्या ब्रम्हसूत्राच्या भाष्यामध्ये हेच मानतात.

२) सांख्य दर्शनामध्ये "निज शक्त्यभिव्यक्तेः स्वतः प्रामाण्यम् ॥" ५-४७
अर्थात – ईश्वराने आपल्या शक्तीने वेदाला प्रकट केले.

गुरु ... 3371 ... २४ ... दयानन्द ...

३) वैशेषिक दर्शनाचे वचन आहे "तद्वचनादाम्नायस्य प्रामाण्यम्।
अर्थात – वेद ईश्वरीय ज्ञान असल्यामुळे वेदांची प्रमाणीकता सर्वोपरी आहे.

४) योग दर्शनाचे मत आहे, की ईश्वराच्या सत्तेमध्ये वेद आणि उत्कर्ष विद्यमान असल्यामुळे अनादी संबंध आहे, जो की नित्य असतो.

प्र. ६६. वेदांमध्ये वर्णित शद्ब-अर्थ संबंध सुद्धा ईश्वरीय आहे काय ?

उ. निश्चितच, वेदमंत्रांचे शद्ब व अर्थ संबंध सुद्धा ईश्वरीय आहेत. त्यांचा सत्य जो भाव प्रकट करतो आणि तोच आदी मूळ शद्ब-अर्थ संबंध ह्या चार दिव्य ऋषींनी आणि नंतर अन्य ऋषींनी मनुष्यांना समजाविले.

प्र. ६७. काय वेद ज्ञान नित्य आहे ?

उ. निःसंदेह; ईश्वराचे वेदामध्ये वर्णित ज्ञान नीत्य आहे. त्यामध्ये कमी, वृद्धी आणि विपरित ज्ञान असत नाही, कारण की ईश्वर स्वतः नित्य–स्वरुप आहे.

प्र. ६८. वेदांचे शद्ब, मंत्र इत्यादी वाक्य समूह असल्यामुळे नित्य कसे होऊ शकते ?

उ. शद्ब दोन प्रकारचे असतात. एक नित्य, दुसरा कार्य. ह्यामधून जे शद्ब–अर्थ संबंध परमेश्वराविषयी आहेत, ते सर्व नित्य आहेत आणि जे मनुष्यांच्या कल्पनेतून उत्पन्न झाले आहेत, ते कार्य शद्ब असतात. कारण ज्याचे ज्ञान आणि क्रिया स्वभावाने सिद्ध व अनादी आहेत. त्याचे सर्व सामर्थ्य सुद्धा नित्य असते. म्हणून वेद सुद्धा ईश्वराचे विद्यस्वरुप असल्यामुळे नित्यच आहेत. नित्य असल्यामुळेच वेद स्वतः प्रमाण आहेत, कारण की सत्य हेच नित्य असते आणि नित्य हेच सत्य असते.

प्र. ६९. काय सृष्टीच्या आरंभी एकच वेद होता ज्याचे नंतर चार वेद करण्यात आले ?

उ. सृष्टीच्या आरंभापासूनच चार वेद होते परंतु वायु पुराण, विष्णुपुराण मत्स्य आणि अग्नी पुराणांमध्ये काही ठिकाणी उल्लेख आहे, की आरंभी एकच वेद होता. द्वापार युगाच्या अंतामध्ये कृष्णद्वैपायन व्यासांनी त्यांना चार भागांमध्ये विभाजीत केले, हे सांगण्याच्या विभिन्नतेचे फल आहे. ईश्वरीय ज्ञान तर एकच आहे

भले ही ते चार वेदांमध्ये असो. त्या वेद ज्ञानाला व्यासांनी व्याख्या करुन सांगितले. व्यासांनी वेदांची रचना केलेली नव्हती. कारण

की वेद तर द्वापारयुगातील व्यासांच्या पूर्वीच प्रकट झालेले होते. ब्राम्हण ग्रंथ, आरण्यक, महाभारत आदी सर्वांमध्ये चारही वेदांचे वर्णन आहे इतकेच नव्हे तर स्वयं वेदामध्ये सुद्धा चारही वेदांचे वर्णन आहे. पहा-

१) अथर्ववेदामध्ये चारही वेदांची नावे –

अ) ऋग, साम, यजु: मही (स्कंभ सूत्र मंत्र १५)

ब) ऋग, साम, यजु: अथर्व ( ,, २०)

क) ऋग, साम, इज्य ब्रम्ह (ओदन सुक्त)

ड) ऋग, साम, यजु: उद्‌गीथ (उच्छिष्टस् मंत्र ५)

इ) ऋग, साम यजु: छंदांसि ( ,, २०)

२) चत्वारि श्रृंगास्त्रयो अस्य पादा:

(ऋग. ४.५८.३ यजु.३. १७.९१.)

३) यस्मिन् वेदा निहिता विश्वरुपा: (ऋग. ४.३५.६ आणि ब्रम्ह प्रजापतिर्धाता लोका वेदा: सप्त ऋषयोऽग्नय: (अथर्व १९.९.२२) मध्ये वेद बहुवचनामध्ये आलेला आहे अर्थात वेद एकापेक्षा जास्त आहेत.

४) पाहि नो अग्न एकया, पाह्युत द्वितीया । पाही गीर्भिस्तिसृभिरुर्जा पाहि चतसृभि: वसो ।। (हजु २७–४३)

अर्थात – त्रयी विद्या असणारी चारही वेदांची वाणी, सायणने सुद्धा ह्याचा अर्थ चार वेद हाच केला आहे.

५) ह्या व्यतिरिक्त यज्ञ कार्यासाठी – होता उद्‌गाता, ब्रम्हा आणि अध्वर्यु अशा चार ऋत्विजांची गरज असते. गोपथ ब्राम्हणाच्या अनुसार ऋग्वेदाचा ज्ञाता होता, यजुर्वेदाचा ज्ञाता उद्‌गाता, अथर्ववेदाचा ज्ञाता ब्रम्हा आणि सामवेदाचा ज्ञाता अध्वर्यु म्हणून ओळखल्या जातो. (गोपथ ब्राम्हण २–४) म्हणजे चारही वेदांच्या ज्ञातांची आवश्यकता असते.

६) शतपथ ब्राम्हण १४.४.१० मध्ये लिहिलेले आहे, की ऋग्वेदो यजुर्वेद: सामवेदोऽथर्वा ङिग्रस: । मध्ये चारही वेदांची नावे आहेत. अर्थात चार वेदांच्या बाबतीत संशयाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

प्र. ७०. "काही लोकांचे म्हणणे आहे की वेद तीन होते" अथर्ववेद नंतर जोडल्या गेला का ?

उ. ह्या सर्व खोट्या कल्पना आहेत. जसे की वर सांगीतले आहे, वेद आरंभापासूनच चार होते, परंतु तीन वेदांच्या बद्दल भ्रांती त्रयी वेद्येचा

अर्थ व्यवस्थित न समजल्यामुळे झाला. वेद त्रयी विद्या आहे. याचा अर्थ तीन प्रकारची विद्या किंवा ज्ञान. वेदामध्ये ज्ञान, कर्म आणि उपासना प्रधानतेच्या कारणामुळे वेदांना त्रयीं विद्या म्हणतात.

दुसरे – यास्काचार्यांच्या अनुसार वेदांचे तीन प्रकार –

१) आधिदैविक २) आधिभौतिक ३) आध्यात्मिक अशा तीन भावांमध्ये करावयास पाहिजे.

तीसरे – वेदांच्या मंत्रांची रचना तीन प्रकारच्याच शैलीमध्ये आहे. ती म्हणजे –

१) पद्यात्मक २) गद्यात्मक ३) आणि गानात्मक, ह्या तिन्ही प्रकारच्या विद्येचा व वेदांच्या नावाचा काही संबंध नाही. ह्या व्यतिरिक्त अथर्ववेदाचे मही, छंद, छंदासी आणि उद्गीथ इत्यादी नावांनी वर्णन केले आहे. (ऋ. १०.९०.१)

यजु ३१–७ अथर्व (१०.७.१९, ११.७.५)ह्यावरुन हेच सिद्ध होते की अथर्ववेद इतर वेदांसमान ईश्वरीय ज्ञान असून सृष्टीच्या प्रारंभा–पासूनच आहे.

प्र. ७१. काय वेदांची उत्पत्ती ब्रम्हाच्या मुखातून झालेली आहे ?

उ. पुराणामध्ये अलंकारिक भाषेमध्ये हे लिहिले आहे, की वेदांची उत्पत्ती ब्रम्हाच्या मुखापासूनच झाली, परंतु ह्याचा खरा अर्थ हाच आहे की ब्रम्ह म्हणजे परमेश्वरापासून वेदज्ञान प्रकट झाले –

१) ब्रम्ह ब्रम्ह दधातु (अथर्व – १.४३.२)
अर्थात – ज्ञानाचा दाता परमेश्वर आम्हांला वेदज्ञान देतो

२) "यत्र ब्रम्ह पवमान छंदस्यां वाचं वदन (ऋ. ९. ११३.२)
अर्थात – ज्यावेळी वेदज्ञान धारणकरणारा ब्रम्हा ईश्वर छंदोमयी ह्या वेदवाणीचे उच्चारण करतो.

३) मनुस्मृति १.२३ मध्ये स्पष्ट लिहिले आहे की –
ऋग, यजु, साम अथर्व असणारा तीन प्रकारचा वेद ब्रम्ह ऋषी, अग्नी, वायू आणि आदित्यापासूनच शिकतो. ह्या वरुन स्पष्ट होते, की वेद हे कोणी ब्रम्हा नामक कोण्या मनुष्याने बनविले नसून हे ईश्वरांनीच निर्माण केले आहे.

प्र. ७२. जर वेद सृष्टीच्या आरंभापासूनच आहेत, तर वैदिक संस्कृत सुद्धा सर्वात प्राचीन भाषा आहे का ?

उ. निश्चितच, विश्वातील समस्त भाषांची उत्पत्ती वैदिक संस्कृत भाषे पासूनच झालेली आहे.

प्र. ७३. वेद वर्तमान मुद्रीत पुस्तकांच्या रुपामध्ये कसे आलेत ?

अनेक वेदपाठी ब्राम्हणांनी विभिन्न विधींनी वेदांचा सस्वर पाठ केला आणि त्यांच्या उच्चारणानुसार लिहिल्या गेलेत आणि त्यावर स्वरांच्या अनुसार उदात्त, अनुदात्त आदी चिन्ह लावण्यात आले. नंतर छापखान्यामध्ये त्यांना मुद्रीत करुन घेतले. विभिन्न प्रकारे पाठ विधिनी उच्चारीत केल्या कारणाने वेदमंत्रांमध्ये स्वर आदीची अशुद्धी नाही.

प्र. ७४. विश्वातील अन्य धर्म पुस्तकां समान मनुष्य सुद्धा वेदांची रचना करु शकत नव्हता काय ?

उ, कदापी नाही. कारण वेदांमध्ये सर्व विशेष लक्षणे आहेत, ज्याचा उल्लेख प्रश्न क्रं. ५६ मध्ये केला आहे. मनुष्यकृत कुठल्याही पुस्तकांमध्ये ह्या सर्व गोष्टी असणे असंभव आहे.

दुसरे – मनुष्याचे ज्ञान अल्पज्ञ असल्याकारणाने सामायिक, देशीय आणि सिमित असते परिणामतः विश्वातील प्राणीमात्रांसाठी व्यवहार्य होणे संभवत नाही.

प्र. ७५. जे लोक वेदांना ईश्वरीय ज्ञान मानीत नाहीत, ते विद्वान नाहीत का ?

उ. निःसंदेह आज असे लाखो लोक विभिन्न विषयांचे विद्वान आहेत. परंतु सत्य हे आहे, की त्यांनी आपले परिश्रम आणि साधने व्यतिरीक्त आपल्या पूर्वज आचार्यां पासून सुद्धा ज्ञान ग्रहण केले. त्यांनी परंपरागत गुरु–शिष्य प्रणालीने मूलज्ञान आपल्या प्राचीनतम पूर्वजापासूनच घेतले आहे आणि ते ज्ञान वेदांचे होते. आपण आज जे काही ज्ञान–विज्ञान, तंत्रज्ञानाची अद्‌भुत उन्नती पाहतो, ती हजारो वर्षांच्या तपस्येचे फल आहे. वेदांप्रती आस्था न ठेवणाऱ्या अनेक दार्शनिकांनीसुद्धा स्वीकारले आहे, की मूल ज्ञानाचा आदी स्त्रोत परमेश्वरच आहे. मनुष्यांनी केवळ त्या ज्ञानाचा क्रमशः विकास केलेला आहे.

प्र. ७६. वेदांच्या रचनेला किती काल झाला ?

उ. वेदांचा अविर्भाव सृष्टीच्या आरंभी झाला होता आणि वैदिक काल–गणना, पुराणे आणि ज्योतीषांच्या अनुसार वेदांना प्रकट होऊन एक अब्ज सत्तावन करोड एकोणतीस लाख एकोणपन्नास हजार चौरांशी वर्षे झालीत. आधुनिक वैज्ञानिक काल गणनेच्या अनुसार सुद्धा सृष्टीच्या रचनेस जवळ जवळ २ अब्जे वर्षे झालीत.

प्र. ७७. तर काही लोक वेदांच्या रचनाकालास तीन–चार हजार वर्षे का मानतात ?

उपरोक्त धारणा पाश्चात्य आणि त्यांच्या प्रभावीत झालेल्या विद्वा-नांची आहे, जे वैदिक परंपरा व वैदिक वाङ्मयाशी अपरिचित आहेत. त्यांच्या धारणचा आधार संभवत: बायबल आहे, ज्यामध्ये मानव जीवनाचा इतिहास केवळ आठ हजार वर्षांचा आहे. ते वेदांना मानव-कृत व वेदांमध्ये मानव इतिहास सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. भूगर्भशास्त्रज्ञांनी सुद्धा वेदांचा रचनाकाल पंचवीस ते पन्नास हजार वर्ष पर्यंत मानला आहे. आचार्य वैद्यनाथ शास्त्रींनी भूगर्भशास्त्र, ज्योतिष्य व वेदातील उदाहरणे देऊन वैदिक युग आणि आदी मानव या पुस्तकामध्ये सिद्ध केले, की वेद सृष्टीच्या आरंभापासूनच आहेत.

७) वेदांची सुरक्षा .–

१८. वेदांना प्रकट होऊन लाखो वर्षे झालीत तर इतक्या दीर्घ कालामध्ये ह्यामध्ये काहीं भेसळ व अशुद्धी झाली नाही का ? वेदांच्या मौलिक-तेची सुरक्षा कशी केल्या गेली ?

वेदांमध्ये कुठल्याच प्रकारची भेसळ नाही. प्राचीन ऋषींना कल्पना होती, की समयाप्रमाणे ह्यामध्ये भेसळ होऊ शकते. तेव्हा वेदांची मौलिकता कायम राखण्यासाठी त्यांनी विभिन्न विधींचा अंगिकार केला होता.

पहिले – परंपरागत गुरु शिष्य प्रणाली ने लाखो वर्षे पर्यंत मंत्रांना कंठस्थ करुन हृदयपटलावर सुरक्षीत ठेवले,

दुसरे – वेदांच्या शब्दांची संख्या मोजून ठेवण्यात आली,

तिसरे – विभिन्न वेदांच्या मंत्राची सुची आणि अनुक्रमणिका बनविल्या गेल्यात.

१९. अशुद्ध उच्चारणामुळे वेदात अशुद्धता येते कां ?

होय, उच्चारणाच्या अशुद्धतेमुळे मूल वेदांमध्ये अशुद्धी येऊ शकते. परंतु त्या उच्चारणाच्या अशुद्धीला घालविण्यास ऋषींनी विबिन्न पाठवि-धींचा अंगिकार केला.

२०. वेदांच्या शुद्धतेसाठी कोण कोणत्या पाठविधींचा अंगिकार केला गेला ?

वेदांची मौलिकता कायम राखण्यासाठी अंगिकार केलेल्या पाठविधींचा इतिहास अती प्राचीन आहे. मधू शिक्षामध्ये मधू सूदन मुनी यांनी लिहिले की –

"भगवान संहिता प्राह, पद पाठं तु रावणः। वाभ्रव्यर्षि क्रमं प्राह, जटा व्याडीरवोचत ।१।
माला पाठं वसिष्ठश्च, शिखापाठंभृगुर्व्यधात् अष्टवक्रोऽ करोद्रे खां, विश्वामित्रोऽपठद्ध्वजम् ।२। दंड पाराशेरोऽत्रोचत कश्यपो रथमब्रवीत् घनमग्निर्मुनिः प्राह, विकृतीनामयं क्रमः ।३।
अर्थात – ईश्वराने वेदांच्या संहिता कुठे रावनाने पद पाठ केला, वाभ्रव्य ने क्रम पाठ केला, व्याडी ऋषीने जटापाठ सुरु केला. वसिष्ठ ऋषीने माला पाठ आरंभ केला, भृगू ऋषीनें शिखा पाठाचे चलन आरंभ केले, अष्टावक्राने रेखा पाठ प्रचारीत केला, विश्वामित्र ऋषीने ध्वजपाठ सुरु केला, पाराशर ने दंडपाठ विद्येचा अंगिकार केला, कश्यप ऋषीने रथ पाठ प्रारंभ किला व अग्नी ऋषीने घनपाठाचे प्रणालीचा वेदांच्या सुरक्षा आणि शुद्धीसाठी अंगिकार केला. ह्या प्रकारे विभिन्न ऋषींनीं अनेक विधींनी वेदांचे संरक्षण केले. ह्या पाठ-विद्येचे दोन भाग करता येतील –

१) प्रकृती पाठ आणि २) विकृतीपाठ

प्र. ८१. प्रकृतीपाठ कशाला म्हणतात आणि ते कोणकोणते आहेत ?

उ. प्रकृती पाठविद्येमध्ये मंत्रांचे शद्बांचा पारस्पारिक क्रम प्राकृतिक म्हणजे मूल रुपामध्येच राहतो, बदलत नाही. जरी शद्बांना सरळ वा उलटे वाचले, तरी क्रम कायमच राहतो. ह्याचे सुद्धा पाच प्रकार आहेत.

१) संहितापाठ :– संहितापाठामध्ये मंत्राचे शद्ब क्रमशः आणि सरल विधींनी स्मरणांत ठेवले जातात.

२) पदपाठ :– पदपाठामध्ये संधीविच्छेद करुन लागोलाग पाठ केल्या जातो.

३) व्युत्क्रम पाठ :– व्युत्क्रमपाठामध्ये पूर्णमंत्राचे प्रत्येक अक्षर शेवटून ते पहिल्या पर्यंत उलट पाठ केल्या जाते.

४) मंडुप्लुत :– मंडुकप्लुत पदपाठामध्ये मंत्रांचा एक–एक शद्ब सोडून पाठ केल्या जातो मंडूकप्लुत पदपाठ आणि सोडलेल्या शद्बाला दुसरी व्यक्ती पाठ करते. म्हणजे पहिल्या व्यक्ती द्वारा शद्ब उच्चारल्या नंतर दुसरी व्यक्ती पुढच्या शद्बाला उच्चारुन पूर्ण करते. याला चर्चा म्हणतात.

५) क्रमपाठ :– क्रमपाठामध्ये मंत्र भागाच्या दोन–दोन शद्बांच्या

जोड्या करण्यात येतात आणि दुसऱ्या शद्बाचे पुन: उच्चारण केले जाते, म्हणजे पहिला–दुसरा, दुसरा–तिसरा, तिसरा – चौथा, अशा शद्बांच्या जोड्या करुन पाठ केल्या जातो.

प्र. ८२. विकृती पाठविधी म्हणजे काय ? आणि कोण कोणत्या आहेत ?

उ. विकृती पाठविधींमध्ये मंत्र भागाचे शद्बांचा पारस्परिक क्रम विकृत म्हणजे बदलल्या जाते. जर मंत्रामध्ये आठ शद्ब असले तर पहिल्यापासून आठव्या शद्बापर्यंत कित्येक प्रकारे त्यांचे पारस्परिक स्थान परिवर्तीत केल्या जाते. ऋषीं द्वारा प्रचारित विभिन्न विकृत पाठविधींना आठ भागांमध्ये विभागल्या जाऊ शकते –

१) जटा २) माला ३) शिखा ४) रेखा५) ध्वज ६) दंड ७) रथ आणि ८) घन

ह्यामध्ये आणखी भेद आहेत जसे – जटा चे दोन भेद, माला चे पंचवीस भेद व रथ चे अकरा भेदांचे विवरण उपलब्ध आहेत. पं श्रीपाद दामोदर सातवलेकर आणि पं. वीरसेन वेदश्रमींनी ह्याची अनेक उदाहरणे आपल्या लेखांमध्ये दिलेली आहेत. वरील संक्षिप्त विवरणावरुन स्पष्ट होते, की जेव्हा एक–एक मंत्र जवळपास पंन्नास विभिन्न पाठविधींनी स्मरण व स्वरांचे अनुसार त्याचे उच्चारण केल्या जाईल, तर मंत्रच काय त्यामधील एक सुद्धा शद्ब, अक्षर, स्वर, अनुस्वार व हलंत याचीही चूक होण्याची संभावना राहत नाही.

शेवटी हे निश्चयपूर्वक म्हटल्या जाऊ शकते की आज जी वेद संहिता उपलब्ध होते, त्यामध्ये लाखो वर्षानंतरसुद्धा कुठल्याच प्रकारची भेसळ व अशुद्धी झाली नाही. म्हणून वेदांच्या मौलिकते विषयी कुणालाही अल्पसाही संदेह व्हावयास नको.

८) वेदांचा उद्देश :–

प्र. ८३. ईश्वराने वेदांचे ज्ञान का दिले ?

उ. ईश्वराने वेदांचे ज्ञान ह्यासाठी दिले, की जेणेकरुन मनुष्याला सृष्टीच्या आरंभापासूनच आपल्या धर्म–अधर्म व कर्तव्य–अकर्तव्याचे ज्ञान व्हावे. त्याला आपल्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास करण्यास मदत व्हावी आणि परिवार समाज आणि राष्ट्राच्या प्रती आदर्श व्यवहार कोणते, हे कळावे व आपल्या परिवाराचा विकास करण्या

संबंधी मानवाला माहिती व्हावी. जर सर्वशक्तीमान न्यायकारी सृष्टीकर्ता परमेश्वर आरंभापासूनच मनुष्याला धर्म–अधर्म सांगितल्या शिवाय ईश्वरीय नैतिक नियमा विरुद्ध काम करणाऱ्यांना शिक्षा देईल तर तो मानवावर अन्याय होईल. नित्य प्रवाहाने चालणारी ह्या सृष्टी-मध्ये प्राणिमात्रांना आपआपल्या कर्मानुसार फल मिळावे, ह्यासाठी हे आवश्यकच नाही, तर तर्कसंगत आणि न्यायपूर्ण आहे, की मनुष्याला यथायोग्य व्यवहारांचे ज्ञान सृष्टीच्या आरंभी दिल्या जावे. आणि नियमोल्लंघन करणाऱ्यांना तदनुसार फळ देण्यात यावे. हीच वैदिक (हिंदू) धर्माची विशेषता आहे.

प्र. ८४. अति प्राचीन वेदांची शिक्षा आज सुद्धा उपयोगी आहे काय ?

उ. निःसंदेह वेदांच्या समस्त शिक्षा (उपदेश) आज सुद्धा पूर्णतः मान–न्यास योग्य, सत्य, व्यावहारिक आणि उपयोगी आहेत. वेदांतील सर्व शिक्षा (ज्ञान) मौलिक सिद्धांत आणि सत्य आदर्शावर आधारीत आहेत. सर्व मनुष्यांसाठी कल्याणकारी असल्यामुळे त्या आज सुद्धा मान्य व उपयोगी आहेत. वेदांची शिक्षा ही भूत, भविष्य आणि वर्तमानरुपी कालाच्या सिमांनी बांधलेली नाही. म्हणूनच वेदाची शिक्षा सदैव उपयोगी व नित्य आहे.

प्र. ८५. वेदांमध्ये धर्मपरिवर्तन करण्याचा उपदेश दिला आहे का ?

उ. वेदांमध्ये कुठेही कुण्या ईसाई, मुसलमान आदींना वैदिक धर्मी (हिंदू) बनविण्याचा व धर्मपरिवर्तन करण्याचा उपदेश नाही, कारण हे सर्व संप्रदाय वैदिक धर्माच्या खूप नंतरच्या कालवधितील आहेत. हे मात्र खरे, की एक श्रेष्ठ मनुष्य (आर्य) बनण्याचा उपदेश वेदातील अक्षर अक्षरा मध्ये सांगितला साहे. वास्तविक वैदिक धर्म हा मानव धर्म आहे.

प्र. ८६. वेदांच्या शिक्षांचा काय उद्देश आहे ?

उ. वेदांच्या शिक्षांचा उद्देश विश्वातील सर्व मनुष्यांचे व्यक्तिगत, सामाजिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टीने सर्वांगीण विकास करुन आपआसांमध्ये शांती व सहयोगाची भावना स्थापीत करणे हे आहे. वेद एक–विश्व–राष्ट्राच्या मौलिक सिद्धांताचा उपदेश करतो. ह्यासाठी शिक्षामध्ये क्षेत्रीयता, सांप्रदायिक संकीर्णता आणि मनुष्यांच्या वर्ण, वंश, रुपा बद्दल भेदभाव व घृणेचा कुठेच उल्लेख नाही. वेदांच्या शिक्षेचा मुख्य उद्देश हा आहे की मनुष्य दररोज सुसंस्काराद्वारा आपला विकास करुन दिव्य गुणांनी युक्त होऊन, उन्नतीच्या उच्चतम अवस्थेला प्राप्त करावे ह्यासाठी वेदांमध्ये अनेक सरल व वैज्ञानिक उपाय सांगितल्या गेले

आहेत. वेदांच्या शिक्षेचा उद्देश कोण्या विशेष प्रदेशामध्ये उत्पन्न कोण्या खास आर्थिक, सामाजिक अथवा राष्ट्रीय वा अन्य कुठल्या सांप्रदायिक समस्यांचे समाधान करण्यासाठी नाही, जसे की आपण बायबल व कुराण मध्ये पाहतो. वेदांची शिक्षा तर रचनात्मक, वैज्ञानिक आणि सत्य पथदर्शक आहे. त्यामध्ये कुठेही विरोधाभास अथवा प्राणीमात्रां–संप्रदायजन्य घृणा नाही. थोडक्यात वेदांची शिक्षा, सत्य, शाश्वत, सार्वदेशिक, सार्वकालिक बुद्धिसंगत, पक्षपातरहित प्रेरणादायक, सरल, रचनात्मक आणि आपल्या जीवनामध्ये अंगिकारण्यास योग्य आहेत. या शिक्षेचा अंगिकार करुन मनुष्याने आपल्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक शक्तींचा अधिकतम विकास करावा. आणि त्या दिव्य व्यक्तित्वांचा उपयोग प्राणीमात्रांच्या कल्याणार्थ करावा. हाच वेदांचा एकमात्र उद्देश आहे.

९) वेदभाष्य आणि भाष्यकार :–

प्र. ८७. वेद मंत्रांच्या सत्यार्थ आणि रहस्यांना कसे समजून घ्यावे ?

उ. प्राचीन ऋषींनी वेदाच्या सत्यार्थाला समजण्याची शैली दाखविली आहे. यास्काचार्यांनी निरुक्त मध्ये म्हटले आहे, की वेदांचे शब्द यौगिक आहेत, रुढी नाहीत. म्हणजे प्रत्येक शब्दाचे प्रतिपाद्य विषयानुसार आधिदैविक आधिभौतिक व आध्यात्मिक भावांमध्ये अर्थ करावयास पाहिजे. यौगिक शब्दांची उत्पत्ती व अर्थ करतेवेळी स्वर, छंदाचा सुद्धा विचार व्हावा. वरील शैली शिवाय विषयानुसार वेदांचा व्यावहारिक अर्थ सुद्धा केला जाऊ शकतो. महर्षी दयानंदांनी त्या शैलीला अंगिकारुन आपले वेदभाष्य केले आहे. त्याचनुसार वेदार्थ करावयास पाहिजे.

प्र. ८८. आज आपणांस वेदांची अनेक भाष्यांमध्ये विभिन्न भाष्ये पाहावयास मिळतात. ह्यामध्ये पारस्परिक विभिन्नता का आहे ?

उ. वेद भाष्यांचे भिन्नतेची पुष्कळ कारणे आहेत जसे –

१) वैदिक शब्दांची अनेकार्थता,
२) भाष्यकारांचे वैदिक संस्कृत भाषेचे ज्ञान,
३) वैदिक वाङ्मयाची परंपरागत शैलीची माहिती,
४) भाष्यकाराचा वेद, भाष्याचा उद्देश व त्याची वेदा सबंधी पूर्वधारणा उपरोक्त कारणामुळे एक किंवा एकपेक्षा जास्तच्या फलस्वरुप वेदमंत्राचे अर्थ विभिन्न होतात आणि केव्हा केव्हा भाष्यकार स्वत: अडचणीत पडतात.

प्र. ८९. प्राचीन कालापासून आजपर्यंत वेदभाष्य शैलींना मुख्यतः किती भागां मध्ये विभागल्या जाऊ शकते ?

उ. पं. युधिष्ठीर मीमांसक ह्यांच्या अनुसार (वैदिक सिद्धांत मीमांसा) समस्त वेदार्थ शैलींना चार भागामध्ये विभागता येईल –

पहिले :– प्राग्याज्ञिक काल आरंभापासून तर द्वापारयुगाच्या प्रारंभा-पर्यंत,

दुसरे :– पूर्वयाज्ञिक कालापासून तर द्वापारयुगाच्या अंतापर्यंत,

तिसरे :– अपरयाज्ञिक काल–कलियुगाच्या प्रारंभापासून तर एकोण–विसाव्या विक्रमी शताद्वापर्यंत आणि

चौथे :– आधुनिक काल

प्राग्याज्ञिक व पूर्वयाज्ञिक कालामध्ये वेदांच्या भाष्यच्या आधारावर वेदांमध्ये विभिन्न ज्ञान–विज्ञान विधा होत्या आणि त्यामध्ये पंचविध अथवा त्रिविध वेदार्थ प्रक्रिया म्हणजे वेदांचा आधीदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक भावांमध्ये अर्थ करण्याची प्रधानता होती. परंतु नंतर म्हणजे याज्ञिक कालामध्ये अशा प्रचाराला प्रारंभ केल्या गेला, की वेदाचा उद्देश यज्ञ आणि कर्मकांड आहे आणि वेदांचा यज्ञ–पूरक अर्थ करण्यात येऊन त्यामध्ये विभिन्न प्रकारचे विनि–योगाची कल्पना करण्यात येऊ लागली.

प्र. ९०. प्राचीन कालातील काही भाष्यकारांची नावे सांगा ?

उ. प्राचीन काळातील काही वेदाचार्यांची नावे – महर्षी ब्रम्हा, कपिल, अमांतरतमा, मरीची, अंगिरा, अत्रि, पुलस्त्य, पुलह, ऋतु, भारद्वाज वशिष्ठ, भृगू, दक्ष, मनू, व्यास पाराशर, जातुकर्ण्य इत्यादी.

मागील पंधराशे वर्षामध्ये (सवंत ६८७ पासून विसाव्या शतकापर्यंत) स्कंध स्वामी नारायण, उदगीथ, हस्तमालक, व्यंकटमाधव, भट्टगोविंद लक्ष्मण, यज्वा, आनंदतीर्थ, आत्मानंद, सायण, रावण, मुद्गल, भरत–स्वामी, भट्टभास्कर, उव्वट, महीधर, शौनक, गौरधर हरिस्वामी, देवस्वामी, आनंदबोध, व्यंकटेश इत्यादी मुख्य आहेत.

प्र. ९१. आजकाल जे भाष्य पाहावयाला मिळतात ते कोणत्या काळातील शैलीला प्रकट करतात ?

उ. आजकाल दोनच काळातील शैलींचे भाष्य पाहावयाला मिळतात–

१) अपरयाज्ञिर – ज्याहृध्ये गृह्यसूत्राचे यज्ञ कर्मकांड व देवतावादीती प्रधानता आहे परंतु काही अभ्यास सुद्धा आहे.

आधुनिक काल – ह्यामध्ये चार प्रकारची वेदार्थ शैली पाहावयास मिळते –

अ) पुराण प्रभावित वेदार्थ शैली ज्यामध्ये बहुदेवतावाद, कर्मकांड आणि विनियोग–परक अर्थ आहेत.

ब) महर्षी दयानंद द्वारा प्राचीन यास्क शैलीची पुनरुद्धारस्वरुप विकसित शैली.

क) युरोपीयन वेदार्थ शैली जी काही अंशामध्ये सायण आधारीत आहे, परंतु देवतावाद, मानव इतिहास इत्यादीच्या विषयामध्ये भारतीय परंपरा ह्यापासून भिन्न आहे.

ड) योगी अरविंद ह्यांची लाक्षणिक शैली जी मूलतः आध्यात्मिक आहे.

प्र. ९२. महर्षी दयानंदाच्या शैलीची काय विशेषता आहे ?

उ. स्वामी दयानंदानी प्राचीन प्राग्याज्ञिक वेदार्थ शैलीचा पुनरुद्धार केला आहे, जी की यास्कांच्या निरुक्तानुकूल आहे, त्यांनी वेदार्थ प्रक्रिया सिद्धांत ठेवले जसे –

१) वेदाचे शद्व, यौगिक अथवा यौगिक रुढ आहेत, पूर्णप्रकारे रुढ नाहीत.

२) जेथे जेथे उपासनेचा विषय आहे, तेथे अग्नी, वायू इत्यादी शद्व ईश्वरासाठी आहेत.

३) मंत्रार्थ देवता म्हणजे प्रतिपाद्य विषयानुसार करावयास पाहिजे आणि स्वर छंदाचा सुद्धा समुचित प्रयोग करावयास पाहिजे.

४) त्यांनी चतुर्थ वेदार्थ प्रक्रिया प्रयोग रचना केली, म्हणजे मंत्रांचे अर्थ आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक आणि व्यवहारिक भावांमध्ये करावयास पाहिजे.

५) वेदांमध्ये मानव इतिहास नाही ह्या मूल सिद्धांताच्या आधारावर त्यांनी सायण, महिधर आदी भारतीय व युरोपीयन विद्वानांच्या वेदभाष्यावर कडाडून टीका केली आहे.

प्र. ९३ युरोपीयन वेदार्थ शैलीचे कोणते सिद्धांत आहेत ?

उ. युरोपीयन विद्वानांनी महान परिश्रम करुन इंग्रजी, जर्मनी आणि फ्रेंच भाषामध्ये वेदांचे भाष्य केले. मूलतः ह्यांचा आधार सायण भाष्य होते. परंतु, त्यांनी सायणभाष्याचा केवल त्या सिद्धांताचा स्वीकार

केला, जो याज्ञिक व देवतावादाचा समर्थन करतो. सायणची अपौरु- षता, प्राचीनता, एकेश्वरवाद आणि प्राचीनता ह्या गोष्टी त्यांनी सोडून दिल्या. त्यांनी वेदांना मानवकृत तीन चार हजार जुने. बहु- देवतावाद मूर्तिपूजा, राज्यांच्या युद्धांचे वर्णनाच्या इतिहासपूर्ण, सामान्य विचारांचा ग्रंथ मानिला आहे. कोठे कोठे प्रशंसासुद्धा केली आहे. अधिकतर युरोपियन विद्वानांचा जसे – मॅक्समूलर, ग्रिफिथ, मोलियर, विलियम्स्, किथ, विंटरनिट्ज, रुडोल्फ, वेबर आदींच्या वेदभाष्यांचा उद्देश भारतियांमध्ये आपल्या पवित्र धर्मग्रंथ वेदांच्या प्रती अश्रद्धा व संदेह निर्माण करणे हा होता आणि मॅक्समूलर ने तर १८६६ मये आपल्या पत्नीस लिहिलेल्या पत्रामध्ये स्पष्ट म्हटले आहे, की "माझा वेदभाष्यचा उद्देश वेदांच्या मूळांना उपटून फेकून देणे हा आहे जो भारतियांच्या मनामध्ये गत तीन हजार वर्षांपासून रुजलेला आहे" ह्या उद्देशपूर्तीसाठी मॅक्समूलरने अनेक कल्पित धारणांना जन्म दिला आहे. वास्तविक पाहता युरोपियन विद्वानांचे भाष्य वेदार्थाच्या परंपरापासून एकदम भिन्न, तथ्यहीन, निराधार असगत आणि वेदांवर कलंक आहे.

प्र. ९४. योगी अरविंद ह्यांच्या वेदभाष्यांची काय विशेषता आहे ?

उ. योगी अरविंदांनी वेदाच्या ऋषींना आध्यात्मिक शक्तीचे प्रतीक म्हटले आहे. आणि वेदांची खूपच सुंदर आध्यात्मिक व्याख्या केली आहे. वेदमंत्रांना भौतिक आणि आध्यात्मिक शक्तिपूंजाच्या रुपात पाहिले. आणि व्याख्या केली आहे. त्यांनी दयानंद सरस्वतींच्या वेदभाष्य शैलीची खूप खूप प्रशंसा केली. योगी अरविंदांचा वेद रहस्य ग्रंथामध्ये आधुनिक विज्ञान, आध्यात्म आणि चिंतनाचा समन्वय आहे.

प्र. ९५. सामान्य पाठकाने कोण कोणते वेदभाष्य वाचले पाहिजे ?

उ. प्रत्येकाने म. दयानंद आणि त्यांच्या शैलीवर आधारित वदभाष्यच वाचावयास पाहिजे. आध्यात्मिक दृष्टीने योगी अरविंदाचे वेद रहस्य सुद्धा वाचावयास हरकत नाही.

प्र. ९६. ऋषी दयानंदाचे चारही वेदांवरचे भाष्य उपलब्ध आहे काय ?

उ. स्वामी दयानंद संपूर्ण यजुर्वेद आणि ऋग्वेदाचे तीन चतुर्थांशच भाष्य करु शकले. परंतु, त्यांच्या अनुयायांनी चारही वेदांचे भाष्य केले आहे. पं. जयदेव मीमांसक ह्यांचे चारही वेदांवर भाष्य आहे. अथर्ववेदा- वर श्री. क्षेमकरणदास त्रिवेदी, सामवेदावर आचार्य वैद्यनाथ,

स्वा. ब्रम्हमुनी. पं. हरिशरण आणि सत्यकाम विद्यालंकार ह्यांचे भाष्य उपलब्ध आहे. काही भाष्य इंग्रजीमध्येसुद्धा उपलब्ध आहे. परंतु वेदांच्या विषयी ऋषी दयानंदाची ऋग्वेदादी भाष्य भूमिका हिन्दी किंवा इंग्रजीमध्ये अवश्य ध्यानपूर्वक वाचावयास पाहिजे.

## १०) वेदांना का आणि कसे वाचावे ?

प्र. ९७. वेदांना का वाचावे ?

श. वेद प्रत्येकाने वाचावयास पाहिजे. कारण की जे वेदांना आपला धर्म ग्रंथ मानतात. त्यांनी तर ह्यासाठी वाचावा, की त्यांच्या धर्मग्रंथामध्ये आजच्या वैज्ञानिक युगामध्ये आपल्या जीवनाला प्रेरणा देणारे कोणते तत्व विद्यमान आहे. जेणे करुन त्यांची श्रद्धा आणखी वाढावी आणि ते तदनुसार आपले आचरण करतील. जे वेदांना मानीत नाही त्यांनी हे मानून वेदांना वाचावे, की ईश्वरीय ज्ञान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विश्वाचे सर्वात जुन्या ग्रंथामध्ये आजच्या तणावपूर्ण, नास्तिकता व अनैतिकतापूर्ण वातावरणामध्ये वेद त्यांच्या जीवनाला कोणत्या प्रकारे सुख, शांती, प्रेरणा आणि स्फूर्ती देऊ शकते. वेदाचे विचार खूप न्यायसंगत, तर्कपूर्ण व व्यवहारिक आहेत. आमचा विश्वास आहे, की वेदाचे अध्ययन, तदनुसार मानणे आणि आचरण केल्याने मनुष्य जीवनामध्ये आपली सर्वांगीण उन्नती करु शकतो. वेदांची निभ्रांत शिक्षा मानवमात्रासाठी प्रत्येक परिस्थितीमध्ये प्रेरणा–दायक आणि मार्गदर्शक आहे. वेदाची उदात्त आणि सार्वभौमिक शिक्षा मनुष्याच्या हृदयामध्ये सात्विक विचार प्रेरीत करुन त्याला दिव्य पुरुष बनण्यास साहाय्यक होतात. वेदांतील शिक्षा नैतिक मूल्याच्या प्रती आस्था ठेवण्यास प्रेरणा देतात. आमचा व्यक्तिगत, पारिवारिक, सामाजिक, राष्ट्रीय व अंतराष्ट्रीय जीवन पारस्परिक प्रेम व सहयोग विश्वबंधुत्व, समानता, मानवतापूर्ण होवो, ह्याचा उद्देश प्राप्तीसाठी आपणास वेदांचे श्रद्धापूर्वक पटन, मनन, चिंतन आणि आचरण करावयास पाहिजे. आम्ही मनुष्य बनावे, आणि आमच्या संततीला दिव्य गुणांनी युक्त बनवावे." बस् ह्यासाठीच वेद वाचनीय आहेत.

प्र. ९८. आज भारतामध्ये वेदाध्ययनाची काय उपयोगिता आहे ?

उ. आज जवळपास पंच्यांशी टक्के भारतियांचा धर्मग्रंथ वेद आहे आणि भारतामध्ये ह्या वेळी जे काही अनेक मतमतांतरे आणि संप्रदाय

पसरलेले आहेत, हे सर्व वेदापासून निर्माण होत आहेत. विभिन्न प्रांतामध्ये स्थानीय भाषा बोलल्या जातात, ज्या संस्कृतपासून निर्माण झालेल्या आहेत. परिणामतः संपूर्ण भारताला एकासुत्रामध्ये बांधण्यासाठी, त्यामध्ये सांस्कृतिक, धार्मिक व राष्ट्रीय एकता आणण्यासाठी "वेद" च एकमात्र आधार आहे. शेवटी भारताला सुदृढ, प्रगतिशील समृद्ध आणि संगठीत करण्यासठी हे आवश्यक आहे, की महर्षी दयानंदाच्या शैलीचे वेदभाष्यांना विभिन्न भाष्यांमध्यें अनुवाद करुन त्याचा प्रचार केला जावा. हीच आपल्या संगठनाची मजबूत साखळी आहे. वेदाच्या शुद्ध स्वरुपाच्या अभावी समाजामध्ये कुरीती, पाखंड, अनैतिकता, अंधविश्वास, राष्ट्रीय विघटन पसरलेले आहे. त्या सर्वांचे औषध वेदच आहे. वेद आपल्या राष्ट्रीय अखंडतेचे एक मात्र सूत्र आहे. वेदच आमच्या राष्ट्रीय आध्यात्मिक शक्तीचा स्त्रोत होता आणि तोच भविष्यामध्ये ही राहील. भारताची भावनात्मक एकता, अखंडता व विशुद्ध राष्ट्रीयतेचा आधार "वेदच" आहे.

प्र. ९९. वेदांना कसे वाचावे ?

उ. वेद ज्ञानाचा पूर्ण लाभ घेण्यास आपणास पहिले वेदांची साहाय्यक पुस्तके वाचावयास पाहिजे. नंतर वेदमंत्रांच्या पाठा पेक्षा वेदांच्या मौलिक सिद्धांतांना वाचले पाहिजे, जेणे करुन हे कळण्यास मदत होते की वेदांना कसे समजावे.

प्र. १०० वेदांच्या सिद्धांतांना आणि रहस्यांना जाणण्यासाठी कोणत्या पुस्तकांची मदत होऊ शकते ?

उ. वेदांच सिद्धांतांना आणि रहस्यांना जाणण्यासाठी खालील पुस्तके साहाय्यक होऊ शकतात.

१) ऋग्वेदादी भाष्य भूमिका आणि
२) सत्यार्थ-प्रकाश – स्वा. दयानंद सरस्वती
३) वेदो का यथार्त स्वरुप – धर्मदेव विद्यामार्तण्ड
४) वैदिक सम्पत्ति – पं. रघुनंदन शर्मा
५) वैदिक संपदा – पं. वीरसेन वेदश्रमी

६) वेद की इयत्ता – स्वां. स्वतंत्रानंद सरस्वती
७) वैदिक सिद्धांत मीमांसा – पं. युधिष्ठीर मीमांसक
८) वेद विद्या निर्देशक आणि वैदिक वाङ्मय का इतिहास
प्रथम भाग – पं. भगवतदत्त
९) वेद ज्योति आणि
१०) वैदिक इतिहास विमर्श – आचार्य वैद्यनाथ शास्त्री
१२) स्वाध्याय संदोह – स्वा. वेदानंद तीर्थ

## 卐 शांती मंत्र 卐

द्यौ. शान्तिरन्तिरक्षँ ॅ शान्तिः पृथिवी

शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिः । वनस्पतयः

शान्तिर्विश्वें देवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्वं ॅ शान्तिः

शान्तिरेव शान्तिः सा मा शान्तिरेधि ।।

– ओ३म् शांती शांती शांती –



## वेदांतील प्रथम मंत्र

१) ऋग्वेद :– अग्निमीळे पुरोहितं, यज्ञस्य देवमृत्विजम् ।
होतारं रत्नधातमम् ॥

२) यजुर्वेद :– इषे त्वोर्ज्जे त्वा, वायव स्थ, देवौ वः सविता
प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मण, आप्यायध्वमघ्न्या
इन्द्राय भागं प्रजावतीरनमीवा अयक्ष्मा, मा व
स्तेन ईशत, माघशंसो, ध्रुवा अस्मिन् गोपतौ स्यात,
बह्वीर्यजमानस्य पशून् पाहि ॥

३) सामवेद :– अग्न आयाहि वीतये, गृणानो हव्यदातये ।
नि होता सत्सि बर्हिषि ॥

४) अथर्ववेद :– ये त्रिषप्ताः परियन्ति, विश्वा रुपाणि बिभ्रतः ।
वाचस्पतिर्बला तेषां, तन्वो अद्य दधातु मे ॥

## वेदांतील शेवटचे मंत्र

१) ऋग्वेद :– समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥

२) यजुर्वेद :– हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
योऽसावादित्ये पुरुषः सोऽसावहम् । ओ३म खं ब्रम्ह

३) सामवेद :– स्वस्ति न इंद्रो वृद्धश्रवाः, स्वस्ति नः पुषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्ताक्ष्यों अरिष्टनेमिः, स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु॥

४) अथर्ववेद :– पनाय्यं तदश्विना कृतं वां वृषभा दिवो रजसः पृथिव्याः ।
सहस्त्र शंसा उत ये गाविष्टौ सर्वां इत् तां उप
याता पिबध्यै ॥

3371

॥ ओ३म ॥

# सुवर्ण–सिद्धांत

१. सर्व सत्यविद्या व जे पदार्थ विद्येने जानले जातात त्या सर्वांचे आदिमुळ परमेश्वर आहे.

२. ईश्वर सच्चिदानंदस्वरुप, निराकार, सर्वशक्तिमान, न्यायकारी दयाळू, अजन्मा, अनंत निर्वीकार, अनादि, अनुपम, सर्वाधार, सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वान्तिर्यामी, अजर, अमर, अभय, नित्य, पवित्र व सृष्टीकर्ता आहे, त्याचीच उपासना करणे योग्य आहे.

३. वेद सर्व सत्यविद्यांचे पुस्तक आहे. वेद शिकणे, शिकविणे, ऐकणे व ऐकविणे हा सर्व आर्यांचा परम धर्म याहे.

४. सत्याचे ग्रहण व असत्याचा त्याग करण्यास सर्वदा तत्पर असावे.

५. सर्व कामे धर्मानुसार अर्थात सत्या-असत्याचा विचार करुन वर्तन केले पाहिजे.

६. प्रत्येकाने शारीरिक, आत्मिक व सामाजिक उन्नति करण्यास मनापासून झटले पाहिजे.

७. सर्वांबरोबर प्रीतिपूर्वक, धर्मानुसार यथायोग्य वर्तन केले पाहिजे.

८. अविद्येचा नाश व विद्येची वृद्धी केली पाहिजे.

९. प्रत्येकाने आपल्या स्वतःच्याच उन्नतीमध्ये संतुष्ट न राहता सर्वांच्या उन्नतीमध्ये आपली उन्नती समजावी.

१०. सर्व सामाजिक हितकारी नियम पाळण्यात सर्व मनुष्यांनी परतंत्र असले पाहिजे व प्रत्येक हितकारी नियम पाळण्यात स्वतंत्र राहिले पाहिजे.

— म. दयानंद


– पुस्तक प्राप्तीस्थान –

डि. ए व्ही. कॉन्व्हेंट,
महात्मा गांधी रोड,
खुले नाट्य गृहा समोर,
अकोला-४४४००१

– प्रकाशक –
सौ. अनुराधा प्र. बोरकर
वेदप्रकाश भवन, बोरकर वाडी,
अकोला-४४४००५